आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
सोमवार, १९ फेब्रुवारी २०२४



आधुनिक केसरी

**युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण विश्वालाच आपल्या आदर्श आचार-विचार, कर्तृत्व आणि संकटावर, शत्रूवर मात करण्याच्या त्यांच्या महापराक्रमाने सर्वाना भारावून टाकलेले आहे. राष्ट्रमाता जिजाऊच्या सुसंस्काराने घडलेल्या शिवरायांचे जीवन-चरित्र सुर्यासारखे तेजस्वी,चारित्र्यवान, समतावादी, प्रयत्नवादी, मित्तहारी, निर्व्यसनी, प्रेमळ, रयतेवर आईच्या मायेने प्रेम करणारे रयतेचे जाणते राजे असे होते. त्यांच्याठायी प्रचंड आत्मविश्वास, आशावाद, सर्वगुण संपन्नता, युध्द कुशलता, प्रगल्भता, बुद्धिमत्ता आणि 'शिवतंत्र' हा गणिमी कावा होता. या सगळ्या गुण वैशिष्ट्यामुळे 'शिवाजीराजे' हे केवळ नाव न राहता ते एक सर्वव्यापी मापदंडाचे 'विश्व विद्यापीठ' झाले आहे.**

# राष्ट्रनिर्माते, विश्ववंद्य छत्रपती शिवाजी महाराज

**शिवपूर्व काळ :-** शिवपूर्वकाळातील यादवांची शेवटची वैभवशाली राजवट ठरली. विजयनगरचा वैभवकाळ संपल्यानंतर पुढे बहमनी राज्याचे विभाजन झाले.त्यात वऱ्हाडची इमादशाही, बिदरची बरीदशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी त्यांची पाच शकले झाली. इकडे दिल्लीत सुलतानशाही संपुष्टात आल्यानंतर तेथे बाबराने मुघल सत्तेची स्थापना केली होती. एकूण काय तर शिवरायांच्या जन्मापूर्वी आपल्याकडे चहूबाजूने मुस्लीम शासकांच्या सत्ता अस्तित्वात होत्या. मुस्लिम राज्यकर्ते आपला राज्यकारभार मुख्यत्वे स्थानिक सुभेदार,वतनदार यांच्यामार्फत करायचे. मग जो वतन देईल त्याची हे लोकं चाकरी करायचे. बखरीमध्ये असा उल्लेख आढळतो की...'ऐसा अंधेर कारभार बादशाही मध्ये कोणी मनास आनीत नाही. पैके पावले म्हणजे एकाचे वतन दुसऱ्यास देतील, बलदंडपणे उभी पिके कापून नेतील,बायकामुली पळवतील, कर्त्या पुरुषाचे खून करतील' यामुळे एकंदर पाहता छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माच्या आधी सर्वत्र अशी बेबंदशाही माजलेली दिसत होती. याच दरम्यान महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात जनप्रबोधनाची चळवळ सुरु झाली होती. अभंग,किर्तनातून जनमानसात जागृती करण्यासाठी संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा विस्तार केला. ते कीर्तनातून सांगत...

**नाचू किर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी**

समतावादी संप्रदायाने गावा-गावातील किर्तनाद्वारे 'ज्ञाना' चा दीप लावण्याचे काम केले. प्रबोधनाचा जागर करत,जनतेवर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी संत मंडळी जोरदार प्रयत्न करू लागले होते. संत नामदेवाच्या समतेचा ध्वज संत तुकाराम महाराज यांनी हाती घेऊन त्यावर कळस चढवला आणि आपल्या अभंगातून अन्याय-अत्याचारावर परखड भाष्य करून लोकांना जागे करू लागले. ते म्हणतात...

**बैसोनिया तक्ता ।**
**अन्नेविण पिडीती लोका**
**तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धाव आता**



यवनांच्या जुलमी अत्याचाराने होरपळणाऱ्या जनतेला बघून तुकोबांनी विठ्ठलाकडे धावा केला. म्हणूनच की काय? राजमाता जिजाऊंच्या पोटी १९ फेब्रुवारी १६३० रोजी युगपुरुष शिवरायांचा जन्म झाला...ज्या स्वराज्याचं देखणं स्वप्न शहाजीराजे आणि जिजाऊंनी बघितले.त्या हिंदवी स्वराज्याची स्थापना करून शिवरायांनी ते स्वप्न प्रत्यक्षात साकार केले. त्यांनी रयतेला स्वातंत्र्याचा श्वास दिला. यामागे माँसाहेब जिजाऊची प्रेरणा होती त्याच खऱ्या अर्थाने त्यांच्या गुरू होत्या. शिवराय जन्म घेत नसतात, तर ते संस्काराने घडवावे लागतात. त्यामुळेच जिजाऊंनी सुसंस्काराने घडवलेले महान राजा छत्रपती शिवराय महाराष्ट्राला मिळाले.त्यामुळे आम्हां भारतीयावर त्या थोर माऊलीचे खूप मोठे उपकार आहेत. त्यांनी प्रसंगी शस्त्र हाती घेतले, संकटसमयी स्वराज्याच्या कारभाराची धुरा सांभाळली, न्यायदानाचे पवित्र कार्य केले. आयुष्याच्या शेवटपर्यंत छत्रपती शिवरायांवर मायेचं छत्र धरलं होतं. रियासतकार गो. स. सरदेसाई जिजाऊ बद्दल म्हणतात की... "तत्कालीन ऐतिहासिक व्यक्तीस राष्ट्रीय स्वत्व दिमाखाने मिरवणा-या शहाजी शिवाय दुसरा एकही हिंदू सत्ताधीश दक्षिणेत आढळत नाही. म्हणून शिवाजीला जन्म देऊन त्याचे ठिकाणी स्वातंत्र्याचे वारे उत्पन्न करण्याचे श्रेय त्यांना आवश्य मिळते"

**हिंदवी स्वराज्य स्थापना :-** आदिलशहाचा सरदार मुरारजगदेवराव याने पुण्याला उद्‌ध्वस्त करून तेथे गाढवाचा नांगर फिरवला. त्या जमिनीत पहार रोवली पहारीला फुटकी कवडी, तुटलेली चप्पल, फाटके वस्त्र गुंडाळले आणि नगरभर दवंडी देऊन द्वाही फिरवली की, जो कुणी येथे वस्ती करेल, शेती कसेल त्याचा निर्वंश होईल...जिजाऊ मात्र असल्या खुळचट कल्पनांना भिक घालणा-या पैकी नव्हत्या त्यांनी ती पहार उपटून फेकली आणि शिवबांच्या हाती सोण्याचा नांगर देऊन शापित भूमी नांगरून काढली. घाबरलेली,गरीब, भोळी,भाबडी बाया-माणसं जिजाऊंचा निर्धार बघून त्यांच्या जवळ आली. त्यांना जिजाऊचा आधार वाटला. जिजाऊनी त्यांना धीर दिला,विश्वास दिला आणि बघता-बघता उजाड-ओसाड पुणे स्थिर झाले, सावरले, उजाड पुणे 'जिजापुर' म्हणून उभं राहिलं...जिजाऊंच्या मार्गदर्शनाने शिवरायांनी अठरा पगड जातींच्या मावळयानां एकत्र केले.त्यात कुणबी, धनगर, माळी, मातंग, महार, कैकाडी, घिसाडी, पारधी, तांबटकरी, लोहार, चर्मकार कुंभार, बेरड, भुई, सुतार, साळी, वडार, डवरी, शिंपी, कोष्टी, गवंडी,गोसावी, वासुदेव इत्यादी विविध जाती जमातींचे तरुण सहभागी होते. कुवत व क्षमतेप्रमाणे प्रत्येकाला जबाबदारी दिली जायची. यातूनच तानाजी मालुसरे नेताजी पालकर, शिवाजी काशीद,जीवाजी महाले. बाजीप्रभू देशपांडे, हिरोजी इंदोलकर, बहिर्जी नाईक यांच्या सारख्या शिलेदारांनी प्राणाची बाजी लावून, पराक्रम करत स्वराज्यासाठी बलिदान दिले. बहिर्जी नाईक गुप्तहेर खाते सक्षमपणे पाहत होते. म्हणूनच राजेंना चौमुलखाची खबर सहज मिळत होती. यात मुस्लीम निष्ठावंत सैनिकांचा सुध्दा तेवढाच सहभाग होता. सिद्दी हिलाल, सिद्दी वाहवाह,सिद्दी इब्राहिम (अंगरक्षक) इब्राहिम खान (हजारी) काझी हैदर (खास सचिव) मदारी मेहतर (साथीदार) हिरोजी फर्जंद, नूरखान बेग (सरनोबत) दर्यासारंग (आरमार प्रमुख) दौलतखान (आरमार अधिकारी) रुस्तमेजमान (यांनीच वाघनखे दिली होती) शमाखाना, सिद्दी अंबर वहाब, हुसेनखान मियाना, सिद्दी मिस्त्री या शिवाय सातशे पठाणांची फौज स्वराज्याच्या संरक्षणासाठी सैन्यात सामील झाली होती.

**शिवकार्य :-** शिवरायांनी सर्वास पोटास लाविले होते. त्यांनी रयतेला आपल्या सात काळजाच्या आत जपणाऱ्या महासम्राट बळीराजाच्या संस्काराची शिकवण आपल्या जीवनात अंगीकारली होती. म्हणूनच त्याच्यासाठी आपले प्राण तळहातावर घेऊन लढणारे लाखों मावळे तयार झाले. त्याचं ब्रीद वाक्य होतं. 'लाख मेले तरी चालतील पण लाखाचा पोशिंदा जगला पाहिजे' छत्रपती शिवाजी महाराजांनी वतनदारांचा बंदोबस्त केला.


जिझिया कराला कडाडून विरोध केला. सक्षम हेर खातं निर्माण केले. रयतेला काडीचाही त्रास दयायचा नाही हा त्यांचा दंडक होता. त्यांनी जलनिती,स्थापत्यशास्त्र,शेती व्यवस्थापनशास्त्र निर्माण केले, सिंधूबंदी उठवली, गुलामांची विक्री बंद केली. राज्य व्यवहार कोष निर्माण केला. पेरणी करीता गरीब व गरजू शेतकऱ्यांना बी-बियाणे,शेत अवजारे देण्याची व्यवस्था केली. शेतकऱ्यांचा,बहुजनांचा,रयतेची कणव असलेला जाणता राजा. स्वराज्याचे पहिले छत्रपती म्हणून आपला राज्याभिषेक करणारे शिवराय इतिहासात एकमेव द्वितीय असेच होते...स्वराज्यात महिला अत्यंत सुरक्षित होत्या, त्यांचा सन्मान राखल्या जात होता. मातृत्वाचा प्रचंड सन्मान करणारे,परस्त्रीला आपल्या मातेसमान मानणाऱ्या शिवरायांनी राझ्यांचा पाटील आणि सकुजी गायकवाड यांनी स्वराज्यातील महिलेशीं केलेल्या आगळीकीमुळे त्यांना कठोर शासन केल्याचे उदाहरण सर्वज्ञात आहेच.

**शिवरायांची थोरवी :-** शिवरायांनी आपल्या कार्यकाळात 365 पेक्षा जास्त किल्ले, सोने, रत्न, हत्ती,घोडे इ. संपत्ती कमवली, पण कधीच त्यावर आपला वैयक्तिक हक्क सांगितला नाही. उलट आयुष्यभर कवडयाची माळ गळ्यात घातली.रयतेच्या सुखासाठी जीवन खर्ची घातले. संत तुकाराम म्हणायचे...'शिव तुझे नांव ठेविले पवित्र छत्रपती सूत्र विश्वाचे की' तसेच अखिल भारतीय पातळीवरील संशोधक यदुनाथ सरकार आपले मत नोंदवतात..."कोणते तरी उदात्त ध्येय उराशी बाळगुन, सत्ता-संपत्ती, प्रसिध्दीचा मोह, ऐषोराम टाळून निस्वार्थ हेतूने आदर्शवाद पत्कारुन सच्चा नेता निर्माण होत असतो. अत्युच्य आकांक्षा सर्वस्व अर्पण करून उच्चध्येयाचा पाठपुरावा करतात. जो पर्यंत त्यांच्या अंतः करणात सर्व लोकांचे कल्याण व्हावे अशी निस्वार्थ भावना असत नाही. तो पर्यंत कुणी 'राष्ट्रनिर्माता' ठरत नाही" म्हणूनच शिवराय इतरांपेक्षा वेगळे आणि खरे राष्ट्रनिर्माते ठरतात... त्यांच्या आयुष्यातील अचाट साहसाच्या घटनामुळे ते अत्यंत धाडसी राजे ठरतात...ग्रँट डफने लिहलेल्या इतिहासावर अधारीत म. फुलेंनी इ.स. 1869 ला शिवरायांवर एक हजार ओळींचा पोवाडा रचला होता. त्यात ते म्हणतात....

**कुळवाडीभूषण पवाडा गातो भोंसल्याचा | छत्रपती शिवाजीचा ||**
**लंगोट्यास देई जानवी,पोषीदा कुणब्यांचा | काळ तो यवनांचा ||**

शिवरायांकडून काय शिकावे :- आपण आज शिवरायांकडून काय शिकावे? तर आपण प्रयत्नवादी, विज्ञाननिष्ठ,प्रामाणिक राहून,उच्चशिक्षित होऊन समाज परिवर्तन घडवावे. समाज,राष्ट्रउन्नती करीता सातत्याने प्रयत्न करावे.स्त्रीयांचा सन्मान राखलाच पाहिजे, स्त्री भ्रूणहत्या थांबवून,महिलांना सुरक्षितपणे जीवन जगता यावे यासाठी जणीवपूर्वक तशी व्यवस्था निर्माण करावी. पाण्याची, पर्यावरणाची हानी टाळावी,ऋण काढून सण साजरे करू नये शिवाय कुठल्याही प्रकारचं व्यसन कधी करु नये...सगळ्यात महत्वाचे शिवरायांचा खरा इतिहास कधीच विसरु नये कारण जो समाज आपला इतिहास विसरतो तो समाज इतिहास घडवू शकत नाही. शिवरायांपासून प्रेरणा घेऊन लाखोंनी आपले हित साधले आणि आपल्या जीवनात यशस्वी झाले. २० व्या शतकात चीन मध्ये लालक्रांती करणारे माओ त्से तुंग असो की आपल्या थडग्यावर 'येथे शिवाजीचा मावळा विश्रांती घेत आहे' असं लिहाणारे व्हीएतनामाचे माजी राष्ट्र अध्यक्ष हो ची मिन्ह असो यांनी सुद्धा शिवरायांपासून प्रेरणा घेतली. स्पूर्तीदायी ऊर्जेचा शिवरायांचा प्रेरणादायी इतिहास, त्यांचा आदर्श, शिकवण,विचार आपण जीवनात आणले पाहिजे... तेच त्यांना खरे अभिवादन ठरेल...चला आपण शिवरायांच्या विचाराचे सच्चे मावळे होऊ या आणि क्षणिक अपयशाने न खचता सकारात्मकपणे अखंड कार्यरत राहू. यातच आपले,आपल्या कुटुंबाचे, समाजाचे, राष्ट्रांचे हित सामावलेले आहे. आपण नक्की यशस्वी होणारच, कारण शिवरायांचे विचार आणि त्यांचे आशीर्वाद आपल्या सोबत आहेत... जय शिवराय!

रमेश काकासाहेब शिंदे
छत्रपती संभाजीनगर
मो : ९४२२९७०८९६





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मराठी वाचकांचा टक्का वाढल्यासारखा मला दिसतो. कारण ग्रंथविक्री विक्रमी झाली...' अनेक नवोदित कवी, लेखक नवनवीन साहित्य लिहून मोलाची भर घालताहेत. तरीही मला वाटतं की अजून उत्तमोत्तम, कसदार साहित्य निर्माण व्हावं. त्या साहित्याच्या वाचनाने नवीन पिढ्या समृद्ध व्हाव्यात. हे साहित्य संस्कार देणारं असावं, जगणं शिकवणारं असावं. सामान्य माणसांच्या आयुष्याशी निगडित गोष्टींची चर्चा साहित्यात व्हावी. त्याला त्यापासून मार्गदर्शन मिळावं. सामान्य रसिक वाचक केंद्रस्थानी ठेवून लेखक, कवींनी लिहितं व्हावं. मराठी मातीत जन्मलेले अनेक सुपुत्र अनेक उच्च पदांवर काम करत आहेत. कोणी शास्त्रज्ञ, कोणी प्राध्यापक इ. पण यातली बरीचशी मंडळी इंग्रजीत लेखन करण्यात धन्यता मानतात. त्यांनी आपले विचार सर्वसामान्यांसाठी मराठीत मांडावे... ' ' शासनाकडून मला फार अपेक्षा नाहीत. माझ्या अपेक्षा तुमच्यासारख्या माझ्या सुपुत्रांकडून आहेत. वाचक, लेखक, कवी यांनी मला समृद्ध करावे ही माझी अपेक्षा. साहित्य संमेलने व्हावीत ती तुम्हा सगळ्या रसिक वाचक, लेखकांच्या बळावर असे मला वाटते. त्यात उत्स्फूर्तता हवी, बळजबरीचा रामराम नको... ! बाळा, माझ्या मनातलं सांगितलं तुला. खूप काही बोलण्यासारखं आहे. पण सगळं सांगण्यातही अर्थ नसतो. समोरच्या व्यक्तीनं सुद्धा समजून घेतलं पाहिजे तरच सांगण्याला, बोलण्याला काही अर्थ उरतो. बाळा, घेशील ना मला समजून...? ' तिचे डोळे पाणावले होते. उरात हुंदका दाटून आला होता. मी तिच्या चरणांना वाकून स्पर्श केला. माझ्याजवळही आता शब्द नव्हते. मी फक्त एवढंच म्हटलं, ' आई, पाठीवर हात ठेवून फक्त लढ म्हण...' तिचा मोरपिशी हात पाठीवरून फिरला. काय नव्हतं त्या स्पर्शात ! ज्ञानोबा, तुकोबा, सावरकर, कुसुमाग्रज आदी सर्व मराठी सारस्वतांचे आशीर्वाद त्यात सामावले होते. मी भारावून वर पाहिलं, तर माऊली अदृश्य झाली होती. गोदामाई शांततेत वाहत होती. माईला मनोमन नमस्कार केला. तिची मूक संमती घेऊन मार्गस्थ झालो. दिव्यांनी रस्ते उजळले होते आणि तारकांनी आकाश... !



## आनंदी पहाट

## मनाला मनस्वी मानणारी माणसे महत्त्वाची

आधुनिक केसरी

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपले मन. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपली मनाची शक्ती. ह्या मनाच्या शक्तीचा थेट संबंध आपल्या भावभावनांशी असतो. आपले मन आणि धन एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या असतात. आपल्या मनातले धन आणि धनाढ्य मन तसेच मनातले घर आणि घरातले मन या दोन्हींचा मेळ आपण घालू शकलो पाहिजेत. आपले प्रत्येक स्वप्न साकार होताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या मनाची यथायोग्य मशागत करणेही तितकेच जरुरीच असते. आपले मन या शब्दांमधूनच आपल्या स्वतःच्या मनाविषयीच्या भाव-भावना प्रकट होत असतात. आपल्याला आपल्या स्वतःच्या मनाची असलेली ऊब आणि त्यामुळेच निर्माण झालेलं आपल्या जागाबरोबरचं नाते अतूट असते. आपण शरीराने आपल्या घरापासून दूर असतो तेव्हा देखील आपल्या मनात आपले घर हे घर करून राहीलेले असते. हि घरघर प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्याप्रमाणे अनुभवली जात असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### मौन वृत्ती होते | स्थितप्रज्ञ ||

करूनी चिंतन | करावे विधान ||
अधांतरी भान | ठेऊ नये ||१||
वाचाळाची वाणी | फजिती कारण ||
मितभाषी जाण | स्थैर्य लाभे ||२||
लटक्याचे बोल | संसार दुःखाचा ||
कलंक भोगाचा | जन्मभर ||३||
संतकृपा होता | वाणी शुद्ध होते ||
अंतरी नांदते | समाधान ||४||
ज्ञानाच्या आधारे | श्रेष्ठत्व लाभते ||
मौन वृत्ती होते | स्थितप्रज्ञ ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी

कोणी सेंदूर घातलाअ ।तेणें प्राणी निर्बुजला ।
घशामध्ये फोड जाला ।या नांव आध्यात्मिक ॥ ३५ ॥
गळसोट्या आणी जीभ झडे ।सदा मुखीं दुर्गंधी पडे ।
दंतहीन लागती किडे ।या नांव आध्यात्मिक ॥ ३६ ॥
जरंडी घोलाणा गंडमाळा ।अवचिता स्वयें फुटे डोळा ।
आपणचि कापी अंगुळा ।या नांव आध्यात्मिक ॥ ३७ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्रकृति योग में ज्ञान जो,
सो जानहु अज्ञान ।
जड़ संयुत दुख सुख रहै, चेतन धर्म है आन ।।५८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/५८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : आत्म्याला अज्ञान अवस्थेत प्रकृती संबंधी जे ज्ञान होते ते अज्ञान आहे. प्रकृतीच्या संबंधामुळेच आत्म्याला सुख-दुःख होते, त्यात शुद्ध ज्ञान प्रगट होऊ शकत नाही. आत्म्याचे शुद्ध ज्ञान भिन्न आहे, जे प्रकृती आधार सुटल्यावर शुद्ध ब्रह्माच्या दिव्य प्रकाशात प्राप्त होते.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## अनुमान निरसन

आधुनिक केसरी

गणेश जयंती व काल झालेली माता सरस्वती प्रगटदिन वसंत पंचमी निमित्ताने सर्व देवदेवतांना विनम्र अभिवादन करून व समर्थांना वंदन करून समासाच्या अभ्यासाकडे वळूया. गुरू शिष्य संवादात कोणते प्रश्न विचारले ते आता सांगते .
१ )चंद्राचं मन कसे आहे? ऊत्तर--निर्मळ
२ ) ब्रम्हदेवाच्या बुध्दीचे लक्षण काय? ऊत्तर-- अचाट व प्रखर बुद्धिमत्ता. ३ )रूद्राचा अहंकार कशा स्वरूपाचा असतो. ऊत्तर---तुमचे मन निर्मळ असेल वागणे बोलणे चालणे अहंकार विरहीत असेल तर अतिशय विशाल अंतःकरणं व भक्तांच्या कल्याणासाठी सदैव धावून येणारा तो रूद्र शिवशंकर, शंभू महादेव ४ )नारायणाचे चित्त कसे असते. ऊत्तर -- सतत आपल्या परमात्म्याच्या ठिकाणी एकचित्त असणारा नारायण त्याच्या शिवाय दुसरा कोणी असु शकत नाही. आपल्या सभोवार निर्मळ मनाने प्रेम करा ? हा संदेश देणारा तो नारायण.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नाम कसे घ्यावे ?

आधुनिक केसरी

नाम कसे घेऊ हे विचारणे, म्हणजे पेढा कसा खाऊ म्हणून विचारण्यासारखे आहे. पेढा कोणत्याही बाजूने खाल्ला तरी गोडच लागतो, तसे नाम कसेही घेतले तरी ते आपले काम करतेच करते. पेढा ज्याने खाल्ला आहे, तो पेढा कसा खाऊ असे विचारणार नाही, तसे नाम घेणारा मनुष्य नाम कसे घेऊ म्हणून विचारणार नाही. शेतात बी पेरतात तेव्हा त्याचे तोंड वरच्या बाजूला आहे की नाही हे पाहात नाहीत. बी शेतात पडते तेव्हा, ज्या तोंडातून मोड यायचा असतो ते तोंड कोणत्यातरी एका बाजूला, खाली किंवा वरही असू शकेल; पण जेव्हा मोड बाहेर पडतो तेव्हा त्याची दिशा मुळात कोणत्याही बाजूला असली तरी तो वळण घेऊन जमिनीतून वरच येतो. तसे, नाम कसेही घेतले तरी घेणाऱ्याची ते योग्य दिशेने प्रगती करून त्याला योग्य मार्गावर आणून सोडील. म्हणून, कसेही करून नाम घ्यावे. नाम घेताना कोणती बैठक असावी, किंवा कोणते आसन घालावे ? हा प्रश्न म्हणजे, श्वासोच्छ्वास करताना कोणत्या तऱ्हेची बैठक असावी असे विचारण्यासारखा आहे. समजा, एखाद्याला दमा



झाला आहे, तर तो काय करतो ? तो अशा तऱ्हेने बसण्याचा किंवा पडण्याचा प्रयत्न करतो की, जेणेकरून श्वासोच्छ्वास कष्टाशिवाय व्हायला मदत होईल; म्हणजे श्वासोच्छ्वास सुलभ रीतीने कसा चालेल, हे त्याचे ध्येय असते, आणि मग त्याकरिता देहाची बैठक कशीही ठेवावी लागली तरी चालते. श्वासोच्छ्वास विनाकष्ट चालू ठेवणे हे जसे त्याचे ध्येय असते, तसे नाम अखंड कसे चालेल हे आपले ध्येय ठेवावे; आणि त्याला मदत होईल, व्यत्यय येणार नाही, अशा तऱ्हेची कोणतीही बैठक असावी. बैठकीला फार महत्त्व देऊ नये. समजा, आपण पद्मासन घालून नामस्मरणाला बसलो आणि काही वेळाने पाठीला कळ लागली, तर आपले लक्ष नामापेक्षा देहाकडेच लागेल; म्हणजे नाम घेता घेता देहाचा विसर पडण्याऐवजी देहाची स्मृतीच वाढल्यासारखी होईल. म्हणून नामस्मरणात खंड न व्हावा हे ध्येय ठेवून, त्याला अनुकूल अशी ज्याच्या त्याच्या प्रकृतिधर्माप्रमाणे कोणतीही बैठक ठेवावी. भगवंताच्या नामाला शरीराचे कसलेही बंधन नाही. हेच तर नामाचे माहात्म्य आहे. मनुष्याच्या कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे स्मरण सहज ठेवता येण्याचे एकच साधन आहे, आणि ते म्हणजे त्याचे नाम होय. पण देहबुद्धी अशी और आहे, की त्या निरुपाधिक नामाला आपण काही तरी उपाधी जोडतो, आणि त्या उपाधीवर नाम घेणे अवलंबून ठेवतो; असे न करावे. इतर उपाधी सुखदुःख उत्पन्न करतील, पण नाम निरुपाधिक आनंद देईल. ४. शुद्ध भावनेत आणि निष्ठेत खरे समाधान आहे; ही निष्ठा अनुसंधानाने उत्पन्न होते.

## जंगली महाराज

आधुनिक केसरी

बगाड या अघोरी प्रकाराऐवजी महाराजांनी गळ्यात वीणा घेऊन देवापुढे अखंड हरिनामाचा पहारा सुरू केला. रेड्यांच्या झुंजींऐवजी जंगली महाराजांनी मल्ल्यांच्या कुस्त्या सुरू केल्या. मंदिरात आजही 'पहारा' होतो आणि जवळपासच्या तालमींमध्ये बलोपासना चालते. जंगली महाराजांनी १८८१ साली स्थापन केलेले सद्गुरू जंगली महाराज भजनी मंडळ आजही कार्यरत आहे.



## अमित शाहांचा दावा

आधुनिक केसरी

नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान होतील असे म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आणि मागच्या दहा वर्षातल्या त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले आहे. मागच्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात समाजाच्या प्रत्येक वर्गाने विकास साधाल आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होतील यात काहीही शंका नाही. तसेच दहशतवाद, नक्षलवाद संपवण्यासाठी मोदी सरकारचा तिसरा कार्यकाळ पुरेसा आहे असाही विश्वास अमित शाह यांनी व्यक्त केला. दिल्लीत भाजपाचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडतं आहे. त्यावेळी झालेल्या भाषणात अमित शाह यांनी हे वक्तव्य केले आहे. मागच्या ७५ वर्षांच्या काळात लोकसभेच्या १७ निवडणुका, २२ सरकारे आणि १५ पंतप्रधान देशाने पाहिले आहेत. देशाचा विकास करण्याचा प्रयत्न त्या त्या सरकारांनी त्यांच्या परिने केला. मात्र आज कुठलाही संभ्रम मनात न ठेवता मी हे आत्मविश्वासाने सांगू इच्छितो आहे की मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात प्रत्येक क्षेत्राचा विकास झाला. समाजातल्या शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहचवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विविध योजनांमधून केले. भाजपा बूथमध्ये काम करणारा व्यक्ती देशाचा राष्ट्रपतीही होऊ शकतो आणि पंतप्रधान होऊ शकतो हे आपण पाहिलं आहे. कारण आपला पक्ष हा लोकशाही मानणारा पक्ष आहे. विरोधी पक्षांवर जोरदार हल्लाबोल करत अमित शाह म्हणाले, "लांगुलचालन करणारे आणि घराणेशाही जपणारे जे पक्ष आहेत त्यांचं नेतृत्व काँग्रेस पक्ष करतो आहे. मात्र भाजपाची प्राथमिकता राष्ट्र प्रथम ही आहे. आपण विकासाचा विचार करतो, मात्र विरोधी पक्षांचा गट असलेली इंडिया आघाडी आणि त्यातले नेते हे आपल्याच मुलांना पंतप्रधान होता येईल का? मुख्यमंत्री कसे होता येईल? यासाठी त्यांचेच चेहरे समोर आणतात. दलित, आदिवासी समाज यांचा वापर इंडिया आघाडीने फक्त व्होट बँक म्हणून केला आहे. मात्र या वर्गाला समान वाटा देण्याचे काम हे आपल्या मोदी सरकारने केले आहे. असेही अधिवेशनात अमित शाह म्हणाले. आप या पक्षावर टीका करताना अमित शाह म्हणाले, आम आदमी पक्षाने मद्य घोटाळा, मोहल्ला क्लिनिक घोटाळा यांसारखे अनेक घोटाळे केले. लोकांच्या मेडिकल टेस्टचाही घोटाळा या पक्षाने केला. त्यामुळेच या पक्षाचे प्रमुख केंद्रीय तपासयंत्रणांपासून पळ काढत आहेत. आज आपण इंडिया आघाडीकडे पाहिले तर ती घमंडिया आघाडी आहे हेच आपल्याला दिसते. कारण या आघाडीत भ्रष्टाचार, घराणेशाही आणि लांगुलचालन याला प्रोत्साहन देणारे लोक आहेत. मात्र भाजपा किंवा एनडीए तशी नाही. आपण आपल्या तत्त्वांवर वाटचाल करत आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा सत्तेत आले की ते घराणेशाही, दहशतवाद आणि नक्षलवाद संपवतील यात शंकाच नाही, असेही अमित शाह म्हणाले.

# शिवरायांच्या स्वराज्याचे तोरण; शेती आणि शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण



डॉ. प्रकाश खेत्री,
मुंबई, ७८४३०९२२४४

आधुनिक केसरी

**शेतकरी हा राष्ट्राचा पोशिंदा आहे, शेती हा देशाचा कणा आहे, कारण आपला देश कृषिप्रधान आहे, पंरतू कृषिप्रधान देशात शेती आणि शेतकरी अडचणीत आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो २०२२ च्या अहवालानुसार गेल्या वर्षी देशभरात एकूण १ लाख, ७१ हजार म्हणजेच दररोज ४६८ शेतकऱ्यानी आत्महत्या केल्या. विशेष म्हणजे दरवर्षी आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. आज शेती आणि शेतकऱ्यांची परिस्थिती दयनीय, भयावह आणि चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर सतराव्या शतकातील शिवरायांचे स्वराज्यातील शेती आणि शेतकऱ्यासंबंधीचे धोरण तारक, पूरक व उपयुक्त ठरते.**

इ.स.१६४४ मध्ये शिवरायांनी रायरेश्वरासमोर हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा संकल्प केला, शपथ घेतली, आणि स्वराज्य प्रत्यक्षात आणण्यासाठी वयाच्या १६ व्या वर्षी इ.स. १६४५ मध्ये पहिल्यांदा 'तोरणा किल्ला' जिंकला आणि 'स्वराज्याचे तोरण' बांधले. राजांनी आपल्या स्वराज्यात शेती आणि शेतकऱ्याला राजाश्रय दिला, कोणत्याही व्यवसायाला जेव्हा राजाश्रय मिळतो, तेव्हा त्या व्यवसायात भरभराट, गती, प्रगती आणि समृद्धी येते. हे शिवरायांच्या शेती आणि शेतकऱ्यांच्या धोरणावरून लक्षात येते.

'दिव्यातील ज्योत विझल्याशिवाय झोपी जावू नकोस, अन्यथा उंदिर दिव्यातील पेटती ज्योत पळवतील. कडब्याच्या गंजी पेट घेतील. गुरा-ढोरांना चारा मिळणार नाही. गुरे-ढोरे दूध देणार नाहीत. माझ्या रयतेची बालके दुधापासून वंचित राहतील. माझा भावी महाराष्ट्र दुबळा होईल. तरी दिव्यातील ज्योत विझल्याशिवाय झोपी जावू नकोस'. अशा आदेश शिवरायांनी दिला होता. यावरून शिवरायांची प्रजेबद्दलची दक्षता लक्षात येते. शेती पिकली तर 'रयत सुखी, राजा सुखी', 'शेतकरी गरीब तर राजा गरीब आणि राजा गरीब तर राज्य गरीब', हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचे सूत्र होते. स्वराज्य हे शेती, शेतकऱ्यांच्या, रयतेच्या कल्याणासाठी आहे, ही त्यांची प्रमुख भावना होती.

शेतकऱ्यांनी जीवापाड जपलेली शेती व घरदार मोगल क्षणात उध्वस्त करत, छळ करत, अशा परिस्थितीत शिवरायांनी शेतकऱ्यांना संघटित केले, आधार व संरक्षण दिले. तेव्हा शेतकरी हे स्वराज्य आपले आहे हे मानत स्वराज्यासाठी कोणतीही पर्वा न करता जीव द्यायलाही तयार होत. तेव्हा शिवरायांच्या स्वराज्यात शेतकऱ्यांचे जीवन सुरक्षीत, सुखी व समृद्ध होते. शेतकऱ्यांना रयत, कुणबी, कुळवाडी अशा नावांनी संबोधले जात असे. शेतकरी आणि शेतीला प्रतिष्ठा होती. राजांच्या स्वराज्यात प्रामुख्याने तीन गोष्टीला प्राधान्य दिले होते. पहिली नापीक जमिन पिकाऊ करणे, दुसरे म्हणजे पीक, गावकरी, शेती आणि शेतकरी यांचे संरक्षण करणे आणि तिसरी गोष्ट म्हणजे सर्व जमिनीची शास्त्र शुध्द मोजणी करून महसुल आकारणी निश्चित करणे. पुणे व परिसरात ओसाड पडलेल्या जमिनीला वहितीखाली आणणे, शेतकऱ्यांना पुन्हा उभे करणे, तसेच नपीक जमीन पिकाऊ करण्यासाठी, पिकाऊ जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी बिनव्याजी रक्कम सुलभ हप्त्याने मुदतीत फेडावी, अशी सवलत स्वराज्यात दिली जात असे. तसेच नवीन लागवडीखाली आलेल्या जमिनींवर सुरुवातीचे चार-पाच वर्षे महसूल कमी ठेवत, अनेकवेळा शत्रू शेतीसाठी आवश्यक बैल, जनावरे पळवून नेत, तेव्हा बैल घेण्यासाठी शेतकऱ्यांना बिन व्याजी कर्ज दिले जात असे. दुर्दैवाने दुष्काळामुळे, अस्मानी आपत्तीमुळे किंवा टोळधाड, साथीचे रोग, युद्धातील हानी, अन्य कारणामुळे शेतकऱ्यांवर संकट आले तर अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्व प्रकारच मदत दिली जात आसे. वेळप्रसंगी राजे कर्जमाफी ही देत. जमिनीचे 'बागायत' व 'जिरायत' असे दोन प्रकार होते.



सिंचनाशिवाय शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी येणार नाही, तेव्हा नदीनाल्यांवर बंधारे बांधून पाणी साठवणाची व्यवस्था केली, साठवलेले पाणी तसेच नदी, तलावाचे पाणी पाटाच्या साहाय्याने जमिनीला पुरविण्यासाठी शिवरायांना योजना केली होती. अशा जमिनीस 'पाटस्थल' असे म्हणत. विहिरीच्या पाण्यावर काही जमीन पिकविली जात असे. तिला 'मोटस्थल' जमीन म्हणत. सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाच्या त्याकाळात मोहोळ तालुक्यात काही बंधारे बांधल्याचा उल्लेख सापडतो. शेतकऱ्याला दुष्काळ व अवर्षणाच्या तडाख्यातून वाचविण्यासाठी हे शिवरायांचे प्रयत्न दुष्काळ मुक्तीच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल होते. शिवकालीन महसूल व्यवस्थापनात जमीन मोजण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत होती. शेती मोजणीसाठी 'काठी' चा वापर केला जात असे. या काठीला 'शिवशाहीकाठी' म्हणतात. एक काठी पाच हात, पाच मुठी लांब असे. २० X २० काठ्यांचा एक बिघा, १२० बिघ्याचं एक चावर असे. बिघा, चावर आदी मोजणीचे शब्द आजही वापरले जातात. एकंदर जमिनीची मोजणी करून ती लागवड करणाऱ्यांच्या नावे लावून तिची नोंद महसूल अधिकाऱ्याच्या दप्तरी असे. मोजलेल्या जमिनीवर महसूल निश्चित केला जाई. महसूल वा शेतसारा निश्चित करतांना जमिनीच्या प्रतवारीचा विचार केला जात असे. नापिक जमिनीवर कोणताही महसुल आकारला जात नसे. तसेच कोणत्या जमिनीत कोणते पीक घ्यावे, त्याचे पत्रकही तयार केले जात असे, यालाच आज आपण पीक पाहणी असे म्हणतो. शेतसाऱ्यांवरील कराबाबत बखरीत वर्णन केले आहे, उत्पन्नाचे पाच हिस्से केले जात, त्यात दोन सरकारकडे तर तीन शेतकऱ्याकडे राहत. महसुल रोख व धान्य स्वरूपात भरता येत असे. शेतसारा निश्चित झाल्यामुळे शेतकऱ्यावर अन्याय होत नसे. ग्रँट डफ ने या 'महसुल पध्दतीमुळे शेतकऱ्याचा फायदा झाला.' असे नमूद केले आहे.

सन १६६७ ते १६६९ दरम्यान महसूल धोरण ठरवल्या गेले. महसूल व्यवस्था लोकाभिमुख होती. रयत आणि शेतकरी हा त्या व्यवस्थेचा केंद्रबिंदू होता. महसूल व्यवस्था 'अण्णाजीपंत धारा' या नावाने ओळखली जात असे. शासकीय महसूल वा कर माफक होता, परंतु शासकीय कराच्या कित्येक पट करवसूली वतनदार, इनामदार, देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी करत. तेव्हा या मंडळीला 'रयतेचा वाटा रयतेस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे' अशा आशयाच्या आज्ञा राजांनी दिल्याचे आढळते. महसुल अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांचे कल्याण साधवे, इमाने इतबारे सेवा करावी, सैन्यातील घोड्यांना दाणा-वैरण लागली, तर रोख रक्कम देऊन खरेदी केली पाहिजे, गावोगाव फिरून शेतकऱ्यांना भेटून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घ्याव्यात. अशा सूचना व आदेश राजांनी दिले होते. महाराज प्रभावळी मामल्याच्या सुभेदार रामजी अनंत यांना ५ सप्टेंबर, १६७६ ला पाठवलेल्या पत्रात म्हणतात, "इमाने इतबारे स्वामीकार्य करावं अशी तू शपथ वाहिली आहेस, त्यानुसार भाजीच्या एका देठावरही मन न दाखविता रास्तपणे व योग्यपणे वागावे. रयतेचा वाटा रयतेला मिळेल आणि महसूल आपल्याला येईल ते करावे. रयतेवर काडीचाही जुलूम झाल्यास आम्ही तुझ्यावर राजी नाही हे नीट समजावे." या पत्रावरून शिवरायांची रयतेविषयी दक्षता लक्षात येते. वतनदारांच्या इनामी जमीनी काढून घेतल्या, धार्मिक संस्थांनाच्या पडीक जमिनी लागवडीखाली आणल्या. स्वराज्याचे उत्पन्न वाढावे हा या मागे उद्देश होता, तसेच ग्रामाधिकाऱ्यांचे वाडे, हुडे, कोट महाराजांनी जमीनदोस्त केले, इतर रयतेसारखी साधी घरे बांधून राहावे, असा हुकूम सोडला. तसेच अधिकाऱ्यांनी लबाडी, स्वार्थ व भ्रष्टाचारापासून दूर रहावे, अशी ताकीद दिली होती. आरमारासाठी झाडे हवे असतील तर जीर्ण झालेले झाडे त्याच्या मालकाच्या पूर्व परवानगीने, योग्य मोबदला देऊन तोडावीत, आंबा-सागाची झाडे तोडू नयेत, शेतकऱ्यांनी त्यांना अनेक वर्षांपासून लेकराबाळांप्रमाणे वाढविलेले असते. ती झाडे तोडली तर शेतकऱ्यांच्या दुःखास पारावारा राहणार नाही. ती तोडणे म्हणजे प्रजेला त्रास देणे आहे. असा शेतकऱ्यांच्या हिताचा कल्याणकारी विचार शिवरायांनी १७ व्या शतकात केला, शेतीविषयक धोरण आखले. ते आजही आपल्याला प्रेरक आणि मार्गदर्शक आहे. तेव्हा शेतीला राजाश्रय देत, स्वराज्य आणि सुराज्य प्रस्थापित करण्याचा निर्धार राज्यकर्ते आणि जनता या दोघांनाही करायला हवा...! हीच खऱ्या अर्थाने शिवरायांच्या विचार, कार्य आणि कर्तुत्वाला आदरांजली ठरेल...

# छत्रपती शिवाजीराजे हे मराठा साम्राज्याचे संस्थापक



रवींद्र मालुसरे
संपर्क क्र. : ९३२३११७७०४

आधुनिक केसरी

**राजे छत्रपती शिवाजी महाराजांचं कर्तृत्व इतकं महान आहे की, गेली ३५० वर्षे त्यांच्या पराक्रमाच्या कर्तृत्वाची गाथेचे पारायण अखंड घडत आहे. आपल्या पराक्रम, कुशल बुद्धिमत्ता, मुत्सद्दी राजकारण आणि सामाजिक धोरण यांच्या बळावर परकीयांच्या मनातही राजा असावा तर असा हा लोभ निर्माण करणाऱ्या अखंड महाराष्ट्राचे दैवत स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची आज जयंती. "आम्ही पूर्ण जग फिरलो. त्यातील भारत हा मुलुख आम्ही जिंकलाच कसा यावर आज विश्वास बसत नाही. शिवाजीसारखा राजा जर आमच्या भूमीत जन्माला आला असता तर ही पृथ्वीच काय तर परग्रहावरही आमचे निर्माण झाले असते" असे लॉर्ड एल्फिस्टन यांनी तर इंग्लंडचे ग्रँड डफ यांनी "राजे केवळ लढवय्ये नव्हते तर सामाजिक आणि अर्थकारण यांची उत्तम जाण असणारे राजकारणी पुरुष होते. हतबल झालेल्या बहुजनांना त्यांच्या चाणाक्ष योजनेमुळे सत्ताधीश होता आले."**

ज्या ब्रिटिशांनी आपल्या देशावर राज्य केले त्यांच्या दोन अधिकाऱ्यांचे हे विचार त्यांनी जागतिक इतिहासात कायमचे कोरून ठेवले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनच एवढे भव्य आहे की, ज्याचे जेवढे अवलोकन करावे तेवढे थोडेच. ते एकाच वेळी द्रष्टे, स्वातंत्र्ययोद्धे, सेनापती, संघटक, स्फूर्तिदाते, युगपुरुषोत्तम होते. त्यांच्या कुठल्याही गुणाला त्यांच्या काळातच नव्हे, तर आताच्याही कित्येक शतकांत तोड नाही. असा हा राजा केवळ पुण्यवंत राजाच नव्हता, तर तो आदर्श नीतिवंत राजा होता. निश्चयाचा महामेरू ! बहुत जनांसी आधारू !अखंड स्थितीचा निर्धारू ! श्रीमंत योगी !! अशा साक्षपूर्ण शब्दांत या जाणत्या राजाचे वर्णन इतिहासात केले आहे. शिवाजी महाराज श्रीमंत तर होतेच; पण योगीही होते. दक्षता, कणखरता आणि तत्परता असा स्थायीभाव असलेल्या शिवछत्रपतींच्या शब्दकोशात आळस नव्हता, उत्साह होता, चंचलता नव्हती, निग्रह होता, मोह नव्हता, ममता होती, भोगवाद नव्हता, त्यागवाद होता. अष्टपैलू, अष्टवधानजागृत, आदर्श राज्यकर्ता, थोर सेनानी, लोकहितदक्ष, धर्माभिमानी; पण परधर्मसहिष्णू, चारित्र्यसंपन्न, असा हा जाणता राजा होता. जगातील थोर पराक्रमी आणि मुत्सद्दी राजांची यादी जर समोर धरली, तर छत्रपती शिवाजी महाराजांची बरोबरी करणारा मोहरा सापडणे दुर्मिळ आहे. नेपोलियन बोनापार्ट, ज्युलियस, सिकंदर, किंवा दुसरे कोणतेही नृपती उदाहरणार्थ घेतले तरी प्रत्येक नृपतीपेक्षा छत्रपती शिवाजी महाराज कांकणभर अधिक आहेत आणि हे शतप्रतिशत कबूल करावेच लागते. छत्रपती शिवाजी महाराज आपले आहेत म्हणून त्यांना श्रेष्ठ ठरवायचे नसून ते एक ऐतिहासिक सत्य आहे. सर्व नृपती मालिकेत छत्रपती शिवाजी महाराजांना अग्रस्थान मिळण्याचे पहिले कारण असे आहे की, त्यांची नीतीमत्ता बलवत्तर होती. मोगल सत्तेने जिकडे तिकडे आपला अंमल बसवला होता व स्त्रियांची अब्रू लुटण्याचा प्रसंग केव्हा येईल, याचा नेम नव्हता. अशा धामधुमीच्या काळामध्ये महाराजांचा जन्म झाला होता. राजांनी हे चित्र स्वराज्यात संपूर्ण बदलून टाकले होते. सर यदूनाथ सरकारांच्या मते,' कृषकवर्ग ' (कुणबी) शिवाजी महाराजांच्या लष्कराच्या पाठीचा कणा होता. लष्करात कुणबी, मराठे, ब्राह्मण, प्रभू, शेणवी, मुसलमान, न्हावी, महार, कोळी, भंडारी, रामोशी, धनगर, आगरी, वैगेरे ५६ जातीचे लोक होते. शिवरायांचे सैन्य राष्ट्रीय होते. केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर भारतातील सर्व जातीतील गुणवंतांना शिवरायांच्या सैन्यात प्रवेश मिळे. माणसांची पारख करूनच त्यांचा सैन्यात समावेश केला जाई.भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाहीविरुद्ध आणि मोगल साम्राज्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य शिवाजी राजांनी उभे केले आणि इ.स. १६७४ मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या २,००० सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

adhunikkesari.com

सोमवार, १९ फेब्रुवारी २०२४



















# खरंच शिवराय परत आले तर...

आधुनिक केसरी

***महापुरुषांच्या नंतर सगळीकडेच त्या महापुरुषाच्या कार्याचा आणि कर्तृत्वाचा जयघोष केला जातो. त्या व्यक्तीला आपले आदर्श मानले जाते. त्याच अनुषंगाने काही लोक भावनिक होऊन "परत या, परत या, महाराज तुम्ही परत या!" अशा घोषणा देतात आणि भावनिक होऊन लोक त्याला दुजोराही देतात. परंतु केवळ भावनेने पोट भरत नसते हे ही तेव्हढेच खरं. काही गोष्टी केवळ बोलण्यासाठीच असतात, त्यापैकी ही एक गोष्ट! अशी आव्हाने करून महापुरुष परत येत नसतात, आणि कल्पना करा, खरंच आज छत्रपती शिवाजी महाराज परत आले तर काय होईल? अनेक जिकरीचे प्रसंग देशासमोर उभे राहतील. आपण गृहीत धरू की, साधारणतः पंचवीस वर्षांचे तरुण वयातील छत्रपती शिवाजी महाराज जर आज अचानक आपल्यामध्ये प्रकट झाले तर काय काय होईल आणि कुणाकुणावर काय परिणाम होतील? ही मोठी मजेशीर गोष्ट असेल! सगळेच आश्चर्य चकित होतील! काहींना मनोमन आनंद होईल तर; अनेकांची मोठी गोची होईल! काय करावे? काय बोलावे? काहीच सुचणार नाही!***

महाराज आल्याबरोबर तत्कालीन काळासारखे आपले संवगडी, सोबती शोधतील! त्यांनी उभारलेले पुणे शहर त्यांना कुठेच दिसणार नाही. भोवताल स्वतःच्या जयंतीचे सगळीकडे पोस्टर्स पाहून त्यांना कसंतरीच वाटेल! भोवताल उभा असणारा तरुण पाहून महाराजांना एकावर एक आश्चर्याचे धक्के बसतील! काही क्षण थांबले न थांबले की; लगेच महाराजांच्या भोवताल लोकांचा एकच घोळका जमा होईल! सगळेजण लगेच महाराजांसोबत तरुण-तरुणी-स्त्रिया-पुरुष सेल्फी काढायची घाई करतील! प्रचंड ढकला ढकली पाहून 'हे काय चालले आहे?' याचा महाराजांना काहींच अंदाज येणार नाही. सगळीकडे गर्दीच गर्दी! तत्काळ कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहील. सगळीकडे पोलीस आणि प्रशासनाची धावाधाव! अनेक भ्रष्ट, लाचखोर अधिकाऱ्यांना "आपण महाराजांसमोर कसे जावे( ?) असा यक्ष प्रश्न पडेल. फोटो आणि सेल्फीच्या नादात महाराजांना कुणी अंघोळ-निवास-भोजन आदि बाबतीत विचारेल का? तेवढ्यात एखादा गरीब माणूस येवून महाराजांना आपल्या घरी घेऊन जाईल. महाराज पाहून त्याला मनोमन आनंद झाला असेल! "बोल बोलता वाटे सोपे" या तुकोक्तीप्रमाणे महाराजांची व्यवस्था आपल्याकडून होईल का? महाराज छत्रपती आहेत! त्यांना आल्याबरोबर आपल्याला त्यांचा हुद्दा बहाल करावा लागेल! हे सगळेच मोठे आव्हानात्मक असेल. महाराज जिथेही जातील आणि तरुणांना भेटतील त्यावेळी तरुणांना काही प्रश्न विचारतील. किती तरुण महाराजांना सामोरे जातील? तात्पुरत्या सजावटीत अडकलेल्या तरुणांना आपल्या मोबाईलपासून सुटका मिळेल का? मोबाईल सोडून तरुण महाराजांच्या सोबत जातील का? त्यानंतर महाराज आपले स्वराज्य शोधण्याचा प्रयत्न करतील. भोवतालच्या दहापाच लोकांना आपल्या राज्याची अवस्था विचारतील. त्यात छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या अनुरूप मानासन्मानाचे पद कोण देईल? सर्वच राजकारणी लोक मोठ्या गोंधळात पडतील. इथे महाराष्ट्रात ज्याचा त्याला पक्ष, सत्ता, घराणेशाही, प्रतिष्ठा, संपत्ती वाचवायचे पडले आहे. सगळीकडे सत्ता सोपान हस्तगत करण्याची जीवघेणी स्पर्धा सुरु आहे! इथे नेमका कोण कोणत्या पक्षाचा निष्ठावंत आहे? कोण कोणत्या पक्षात आहे? असे एक न अनेक प्रश्न त्या त्या राजकारणी लोकांसमोर पडलेले असतांना प्रत्यक्ष शिवराय समोर बघून सगळी परिस्थिती कठीण होऊन जाईल! सगळेच पक्ष आपापले अस्तित्व टिकवण्याचा आटापिटा करत असतांना अचानक छत्रपती शिवाजी महाराज आलेले पाहून त्यांच्यासमोर अनंत प्रश्न निर्माण होतील. काय करावे आणि काय नाही? असा घन प्रश्न निर्माण होईल! सर्वच राजकीय पक्षांच्या पोस्टरवर आपला स्वतःचा फोटो प्रथम छापलेला पाहून त्यांना एकावर एक आश्चर्याचे धक्के बसायला लागतील! अशात भ्रष्ट, व्यसनी, लोभी, सत्तांध, व्यभिचारी, स्वार्थी, लुटारू सत्ताधाऱ्यांना प्रत्यक्ष छत्रपती महाराज आलेले पचतील का? आल्याबरोबर महाराज कुठे जातील? हे सगळे पाहून महाराजांना आपल्या स्थापन केलेल्या रयतेच्या राज्याची आजच्या एकूण अवस्थेची तुलना करून पाहताना वर्तमान परिस्थितीची किळस येईल! अशी बजबजपुरी पाहून महाराज प्रचंड व्यथित होतील! त्यामुळे कुणा राजकीय किंवा अधिकारी व्यक्तीकडे न जाता महाराज सरळ सामान्य रयतेमध्ये जातील. गोरगरिबांच्या झोपडीत राहणे महाराज पसंद करतील! तिथे सामान्य लोक प्रचंड गर्दी करतील. लोकांची प्रचंड गर्दी पाहून महाराज अचंबित होतील. अनंत समस्या घेऊन लोक महाराजांसमोर उभे असतील. पिडीत, शोषित, गरीब स्त्रिया-पुरुष आपली कैफियत महाराजांकडे मांडतील. महाराज भावनिक होतील. आपल्या अष्टप्रधान मंडळाला आदेश देण्याच्या आवेशात असतांना त्यांच्या लक्षात येईल की; इथली बेगडी, खोटारडी लोकशाही मुठभर धनदांडग्या चोरांच्या दावणीला बांधली असून हे चोरंच साव असल्याचा आव आणून दिवसाढवळ्या लोकशाहीचे लचके तोडत आहेत. तिची अब्रू लुटत आहेत! पिढ्यानपिढ्या सत्ता यांच्याचकडे असून यांनी कोणतीही लोकोपयोगी कामे केली नाहीत हे पाहून महाराज व्यथित होतील! सामान्य रयतेमधून उठून महाराज ताडताड विधान भवनाकडे निघतील! भव्य विधानभवन पाहून महाराजांना आनंद होईल! पण ते विधानभवन महाराजांना पाहून ढसा ढसा रडायला लागेल! विधानभवन महाराजांना, "महाराज, इथे सामान्य माणसांचे प्रश्न केवळ चर्चिले जातात, मात्र त्याच्यावर अमलबजावणी होत नाही. शेतकऱ्यांच्या मालाच्या भावाची केवळ फोलपट चर्चा होते, मात्र शेतकरी मालाला भाव काही मिळत नाही!" अशी व्यथा कथन करेल. करोडोंची उलाढाल होणारे मंत्रालय हे भ्रष्टाचाराचे कुरण झालेले पाहून महाराज मनातून व्यथित होतील! मंत्रालयाच्या पायरीवर बसून महाराज ढसाढसा रडतील! "मी रयतेचे राज्य निर्माण केले होते! जात-पात-धर्म-पंथ-लिंग याचा भेद कधीच केला नाही! शेतकरी सुखी केला. स्त्रीची अब्रू शिरसावंद्य मानली. आई-वडिलांची आजीवन सेवा केली. अठरापगड जातीतील निष्ठावंत, शूरवीर, जीवाला जीव देणारी माणसं उभी केलीं! असं असतांना लोकशाहीत ही धनदांडग्यांची लोकशाहीयुक्त हुकुमशाही कशी काय उभी राहिली?" हे पाहून महाराज ताड्कन उठतील आणि पुन्हा आपले स्वराज्य निर्माण करण्याची प्रतिज्ञा करतील! सर्वच राजकीय पक्ष प्रमुखांना पाचारण करून विचार विनिमय करण्याचा प्रयत्न करतील. तेंव्हा एकतरी राजकीय पक्ष प्रमुख महाराजांच्या हातात आपल्या पक्षाची सूत्रे सोपविल का? त्यांच्या सोबत राज्य करायला, आपल्या घरातील सत्ता आणि करोडोंची संपत्ती द्यायला तयार होईल का? असे एक ना अनेक प्रश्न उभे राहतील. तेव्हा, सज्जनहो, जाउ द्या! गेलेली माणसं पुन्हा परत येत नसतात. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा वसा-वाण घेऊनच आपल्याला पुढे जावे लागेल! एवढेच कार्य आपण करू शकतो. काळ नेहमीच एक आव्हान म्हणून आपल्या समोर उभा असतो. त्यासाठी आपण आपल्या जीवनात, वर्तनात, बोलण्यात, कार्य आणि विचारात छत्रपती शिवाजी महाराज उतरवावे लागतील! अलीकडे महाराज आपल्याला मिडीयावर स्टेट्स, स्टोरी, पोस्टर्स, डीपी, शर्ट, टी शर्ट, स्वेटरवर दिसत आहेत! ही आनंदाची बाब आहे, परंतु सगळीकडे असणारे राजे आपल्या जीवनात उतरलेत का? केवळ देखाव्यात दिसणारे शिवराय मात्र आपल्या वर्तनातून लुप्त झाले आहेत. त्यासाठी छत्रपतींना आपल्या जीवनात उतरवावे लागेल! असे होणे म्हणजेच महाराज पुन्हा येणे होय! जय हिंद! जय शिवराय! **(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, समीक्षक आहेत.)**



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068




# छत्रपती शिवराय : एक विश्वव्यापी आदर्श

आधुनिक केसरी

***ज्या काळात या मातीत स्वातंत्र्याचं स्वप्नं पाहण ही जीवघेण ठरायचं,पिढ्यान-पिढ्या अन्याय सहन करणारी जनता इथे निपचित गुलामगिरीत खितपत पडून राहायची.मुघलशहा,आदिलशहा,निजामशहा,कुतुबशहा यांच्या अतिक्रमनाने रयत अक्षरशः होरपळून निघायची,त्याच मातीत १९ फेब्रुवारी १६३० रोजी एक देखणं स्वप्न साकार झाल,जन्माला आल आणि डोळ्याच पारण फेटणार राज्याचं सुराज्य निर्माण झाल.एका राजाने आपल्या रयतेसाठी राज्याचं सुराज्य तर निर्माण केलचं शिवाय राज्यात प्रत्येक व्यक्तीला समानतेने, निपक्षपातीपणाने सन्मानाने वागवलं.सर्व मानवी अधिकार नाकारलेल्या जनतेला न्याय मिळावा यासाठी स्वसामर्थ्याने,स्वकर्तृत्वाने सुवर्णसिंहासन निर्माण केलं. आजही जगातील असंख्य रयतेच्या मना-मनावर व मातीच्या कणा-कणावर राज्य करणारा,एकमेव व्दितीय रयतेचा जाणता राजा म्हणजे कुळवाडीभूषण,'छत्रपती शिवाजी महाराज.***

'छत्रपती शिवाजी महाराज' हे तीन शब्द उच्चारातच अंगात एक प्रकारची वीरश्री संचारते,छाती अभिमानाने फुलुन येते व शिवविचारांनी सशक्त झालेलं हे मस्तक आपसुकचं राजेंच्या चरणी नतमस्तक होत. फक्त महाराष्ट्र,भारत देशचं नव्हे तर अवघ्या विश्वाला प्रेरणा देणारा एकमेव प्रेरणास्त्रोत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।

अगदी वयाच्या बाराव्या वर्षी शहाजी महाराजांनी शिवरायांना दिलेली राजमुद्रा शिवरायांचा स्पष्टपणे ' विश्ववंदिता 'असा उल्लेख करते.याचा अर्थ शिवरायांची किर्ती हे विश्ववंदनीय आहे.शिवरायांची किर्ती ही अथांग आहे.जगातील अखंड रयतेला प्रेरणा देण्याची ताकद 'छत्रपती शिवाजी महाराज' या तीन शब्दांत आहे. इतिहासातील नेपोलियन बोनापार्ट,माओ-त्से-तुंग,हो चि मिन्ह,थॉमस जेफरसन अशा अनेक क्रांतीकारकांनी शिवरायांना प्रेरणास्थान मानून अनेक क्रांती घडवून आणलेल्या आहेत.व्हिएतनामच्या हो चि मिन्हच्या समाधीवर ' शिवरायांचा मावळा इथे विश्रांती घेत आहे.' या अर्थाचे शब्द कोरलेले आहेत.तसेच शिवाजी राजे जर आमच्या देशात झाले असते तर आमच्या मुलांना आम्हांला काल्पनिक हरक्युलीस अथवा स्पाईडरमॅन-सुपरमॅनच्या कथा शिकवाव्या लागल्या नसत्या, अशी पाश्चात्य अमेरिकन-युरोपियन राष्ट्रांची भावना आहे.यावरुन महाराजांच्या विश्वव्यापी किर्तीची व्याप्ती किती अफाट होती, याची प्रचिती आपल्याला येते ; म्हणुन शिवरायांची कीर्ती केवळ एका धर्माच्या किंवा जातीच्या चौकटीत बंदिस्त करता येत नाही व ती बंदिस्त करण्याचा प्रयत्न ही कोणी करु नये.शिवराय ही केवळ एक व्यक्ती नसून तो एक चिरंतर विचार आहे,जो विचार समजून घेण्यासाठी बुध्दीची परिपक्वता लागते,हे तमाम शिवप्रेमींनी लक्षात घेणे अत्यंत गरजेचे आहे.

छत्रपती शिवरायांचे राज्य म्हणजे अठरा-पगड जातींच्या कष्टक-यांचे,दीन-दलितांचे,गरिबांचे,राज्य होते.राज्यात राहणा-या प्रत्येक सर्वसामान्य माणसाला ते आपलं स्वतःच राज्य वाटत असे. सर्व जाती-धर्मांना 'मावळे ' या एका धाग्यात गुंफून एकता सर्वधर्मसमभाव व एकात्मता निर्माण करण्याची ताकद ही फक्त जिजाऊच्या संस्कारांची व शिवविचारांची ताकद होती.शिवरायांच्या स्वराज्यात समतावाद,सर्वधर्मसमभाव हा काठोकाठ भरलेला होता. आपल्या कल्याणकारी राजासाठी प्राणपणाने लढणे हे प्रत्येक मावळ्याने आपल्या मनावर स्पष्टपणे बिंबवून तर ठेवलेचं होते,प्रसंगी मरण ही पत्कारण्याची धमक ही फक्त शिवरायांच्या निष्ठावान मावळ्यांमध्येच होती.स्वराज्यात महाराजांसाठी लढणारे मावळे हे कोणत्याही एका जाती-धर्माचे नसून ते विविध जाती धर्माचे मावळे होते.त्यात अफजलखानाच्या भेटीवेळी सोबत असणारे जिवाजी महाले,प्रतिशिवाजी होऊन आपले प्राण पणाला लावणारे शिवाजी काशिद,आग्रा कैदेतून महाराजांची सुखरुप सुटका करुन मृत्यूला सामोरे जाणारे मदारी मेहतर व हिरोजी फर्जद,जीवाची बाजी लावून घोडखिंड अडवून ठेवणारे बाजीप्रभू देशपांडे इ.शिवरायांसाठी प्राणपणाने लढणारे निष्ठांवंत मावळे होते.

छत्रपती शिवरायांची आपल्या स्वधर्मावर श्रध्दा होती याबाबतीत कोणतेच दुमत नाही; पण त्यांनी इतर कोणत्याही धर्माचा कधीच व्देष केला नाही. सध्याच्या वर्तमान स्थितीत हे लक्षात घेण अत्यंत गरजेचे आहे.कारण वर्तमानकालीन प्रासंगिकता पाहता असे लक्षात येते की, विश्व जोडण्याची ताकद असणाऱ्या आपल्या महामानवांना आज एका विशिष्ट जातीत-धर्मात बांधून ठेवल जात आहे व एकमेकांच्या मनात व्देष निर्माण करून स्वतःच उखळ पांढरं करण्याच काम काही विकृती मनोवृत्ती करताना दिसत आहेत.शिवरायांच्या स्वराज्याच्या विचार केला असता शिवाजी महाराजांकडे मोठ्या-मोठ्या हुद्द्यावर मुस्लिम सरदार व सैनिक कार्यरत होते.त्यात वकील काजी हैदर,तोफखाना प्रमुख इब्राहिम खान,सरनोबत नूरखान बेगम,आरमार प्रमुख दर्यासारंग इ.अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील.मुळात त्या काळातील लढाया या धर्मासाठी मुळीच लढल्या जात नसत.राज्यविस्तार करणे हा मुळ मुद्दा होता.त्या काळात स्वधर्मात लढाया होत होत्या. महाराजांनी कधीच कोणत्याच धर्माचा व्देष केला नाही. खाफीखान या मुस्लीम इतिहासकाराने एका उता-यात नोंदवून ठेवलेले आहे कि, शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांत असा सक्त नियम केला होता कि,सैनिक ज्या ठिकाणी लूट करतील,तेथे एखादी कुराण ग्रंथाची प्रत हाती आली तर ती प्रत सहीसलामत त्याबद्दल पूज्यभाव दाखवून मुस्लिम व्यक्तीस सन्मानाने स्वाधीन करावी.महारांजाचे धोरण व विचार अनन्यसाधारण आहेत.आपल्या धर्माइतकाच इतरांचा ही धर्म श्रेष्ठ असतो.उपासना पध्दती वेगवेगळ्या असल्या तरी त्यांचा उद्देश मात्र एकच आहे.इतर धर्माविषयीचा हा डोळस दृष्टीकोन छत्रपती शिवरायांचा शिवचरित्रातून शिकणे गरजेचे आहे. सद्यस्थिताचा जर विचार केला तर आपणांस असे लक्षात येते कि,काही अंधभक्त आपली स्वार्थाची पोळी भाजण्यासाठी सर्व महामानवांना एका विशिष्ट जातीच्या, धर्माच्या चौकटीत बसवून समाजात विषमता, अराजकता, वैमनस्य पसरवत आहेत आणि इथेचं खरी महामानवांच्या विचारांना मूठमाती मिळतेय.यातूनच पुढे समाजात जातीय दंगली,हल्ले यांसारख्या घटना घडतात.त्यामुळे आजच्या तरुणांनी महापुरुषांचे विचार डोक्यावर न घेता ते विचार डोक्यात घेऊन अंधभक्त न होता, डोळस दृष्टी ठेवून त्या विचारांचे आचरण करणे ही खरी काळाची गरज आहे.



कल्पना घुगे-बामणे,
छत्रपती संभाजीनगर



# शिवजयंतीतून महाराजांचे विचार पेरूयात

आधुनिक केसरी

***शिवजयंती म्हटलं की एक वेगळा आनंदाचा जल्लोष पाहायला मिळत असतो.शिवजयंती कशी साजरी करायची म्हणून यासाठी एक दोन महिना अगोदरच नियोजन होत असते.आपल्या राजाची जयंती जवळ आली की लहान चिमुकल्यापासून ते थोरा मोठ्या पर्यंत सगळेच आनंदी होत असतात.अगदी नियोजन करण्यात व्यस्त राहत असतात.काही ठिकाणी किल्ल्यांचे देखावे सुद्धा आकर्षक पध्दतीने बनविले जातात तर सांस्कृतिक कार्यक्रमातून पोवाडा सादरीकरण असो,शिवरायांचे शौर्य दाखविणारे चित्रपट असो किंवा विचार मंथन व प्रबोधन घडवून आणणारी व्याख्याने असोत अशा प्रकारचे नियोजन आपल्याला महाराष्ट्राच्या मातीत शिवजयंती दरम्यान पाहायला मिळते.***

खरंतर शिवराय असो किंवा समाजाच्या हिताच्या दृष्टीने कार्य करणाऱ्या प्रत्येक महापुरुषाची जयंती असो आपल्या महाराष्ट्रात ती विविध उपक्रमांनी साजरी केली जात असते.



सतिश ज्ञानोबा गायकवाड
अध्यक्ष-माऊली सेवादल
तरडगांव, ता.फलटण, जि.सातारा

आपल्या आदर्शांचे विचार लोकांमध्ये घेऊन जाण्यासाठी विचार पेरणाऱ्या विविध उपक्रमांना हाती घेणे अत्यंत गरजेचे असते.खऱ्या अर्थाने विविध उपक्रमांनीच जनजागृती घडून येऊ शकते.
छत्रपती शिवाजी महाराज समजून घेण्यासाठी त्यांना वाचणे आवश्यक आहे. त्यांच्या जीवनावर आधारीत माहिती जाणून घेण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र म्हटलं की आपल्या समोर छत्रपती शिवाजी महाराज तर आठवतातच शिवाय संत परंपरा आणि फुले,शाहू,आंबेडकरांची प्रबोधनाची चळवळ सुद्धा डोळ्यासमोर येत असते.महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडे आपण आदराने पाहत असतो.त्यांचे कार्य,त्यांचा विचार हा फक्त महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण जगाला प्रेरक आहे.आज ही त्यांच्या विचारांची आपल्याला गरज आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेले स्वराज्य हे रयतेचे राज्य होते.सर्व जाती धर्मातील लोकांना सामावुन घेणारे होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त कोण्या एका जातीचे नव्हते तर सर्व जाती धर्माचे बनले.आजही शिवरायांचे विचार तळागाळात घेऊन जाण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत.कारण हा राजा आपल्या सर्वांचा होता.आपल्या सर्वांचे हित जपणारा होता.त्यामुळे शिवरायांचा इतिहास हा जाणून घ्यायला हवा.पुढच्या पिढीला तो समजून सांगितला पाहिजे.शिवराय हा नुसता विचार नाही तर आपण आपल्या आयुष्यात कसे जगावे हे शिकवित असतो. शिवरायांच्या इतिहासाची पाने उलघडताना त्या पानांना आपल्या वर्तमानात घेऊन मार्गक्रमण करत राहणे महत्वाचे आहे.शिवरायांचा जन्मोत्सव साजरा करत असताना शिवरायांचे विचार पेरण्यासाठी पुढे आले पाहिजे.शिवरायांची जयंती नाचून साजरी करण्यापेक्षा त्यांचे कार्य आणि विचार लोकांमध्ये पोहचविण्यासाठी वैचारिक मंथन करणारे उपक्रम घेणे अपेक्षित आहे.फक्त जात धर्म यांमध्ये महाराज गुंतवून न ठेवता, सर्वसामावेशक जयंती उत्सव हा एकीचा नारा देणारा बनला पाहिजे.शिवजयंती साजरी करताना महाराज हे फक्त किल्यावरून ज्योत आणण्यापुरते त्यांचा जयघोष न करता त्यांनी दिलेल्या स्वराज्याचे विचार आत्मसात आणले पाहिजे.शिवजयंती हा एक आपला सण,उत्सवच आहे.आजच्या सर्वच धर्माच्या तरुण वर्गात या सणाचा उत्साह दोन तीन महिने अगोदरच अगदी अंगात भरभरुन वाहत असतो व ते साहजिकच आहे."शिवजंयती" साजरी केलीच पाहिजे.ही भावना मनात असते."शिवराय मनामनात,शिवजयंती घराघरात" हा विचार सुद्धा लोकांकडून मांडला जात असतो.या दिवशी शिवजयंती आहे.म्हणून महाराष्ट्रातील प्रत्येक घरातून हा जन्मोत्सव शिवरायांच्या कर्तृत्वाची प्रेरणा जागृत करत असते. एकवेळ एखादा सण नाही साजरा केला तरी चालेल पण हा "शिवजंयती" सण साजरा झालाच पाहिजे. विविध जाती धर्मातील लोकं तसेच सामाजिक व राजकिय संघटनेतून सुद्धा शिवजयंती मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.महाराजांच्या उत्साहाने बळाची ताकद न विसरता,विचारांचा विसर मात्र पडता कामा नये.महाराज समजून घेण्यासाठी त्यांचे



विचार ऐकणारी पिढी तयार केली पाहिजे.कारण हल्ली या पिढीला शिवराय फक्त नाचण्यापुरते आणि जयघोष करण्यापुरतेच गरजेचे वाटू लागलेले आहेत. शिवरायांना डोक्यात घेऊन त्यांचा आदर्श निर्माण करणारी पिढी तयार करण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने आपल्या सर्वांची आहे.महाराजांनी स्वराज्य निर्मितीतून खऱ्या अर्थाने प्रजेचे राज्य निर्माण केले. प्रत्येकाला सन्मान मिळवून दिला.त्या काळात स्त्री कडे कुणाची वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत ही होत नसे असा दरारा आपल्या राजाचा होता. आपल्या महाराष्ट्रात महाराजांच्या विचारांना काळीमा फासला गेला जाणार नाही.यासाठी आपण शिवरायांचे मावळे म्हणून आपली जबाबदारी तर राहणार आहेच.शिवरायांचा विचार हा घरा घरात घेऊन जाण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. महाराजांनी "रायगडावर शिवराज्यभिषेक" केला. त्यावेळी महाराजांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्रपणे करुन मानाप्रमाणे पदभार देऊन मान सन्मान केला.त्या काळातला महाराजांचा हा एक विचार घेऊन प्रत्येक गावात सर्वांनी आजची एकच "शिवजयंती" याच प्रकारे साजरी करुन महाराजांना खरी मानवंदना दिली पाहिजे. हिच खरी शिकवण आज गरजेची आहे. सर्वांनी विचारांच्या ताकदीने एकत्र येऊन एक गांव एक "शिवजयंती" साजरी करावी.तरच खरी "आधुनिक मानाची शिवजयंती" साजरी करुन छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा होईल.कोण्या एका जातीने शिवजयंती साजरी न करता आपण सर्व जाती धर्माचे भारतीय नागरिक एकत्र येऊन शिवजयंतीचा जल्लोष एक दिलाने साजरा करण्यासाठी पुढाकार घेऊयात."एक गांव एक शिवजंयती" साजरी करण्याचा संकल्प करुन महाराजांनी मिळवून दिलेल्या स्वातंत्र्यात गोर गरीबांची सेवा करुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जतन करुन "शिवस्वराज्य" देशभर निर्माण करुयात.फक्त मोठ मोठ्याने घोषणा देण्यापेक्षा 'महाराजांच्या एकविचारांच्या एकीने' आपण सर्वजण एकत्र राहून देशावर महासत्ता निर्माण करु.मग!आर्थिकच काय ? नैसर्गिक संकटावरही आपणास सहज मात करता येईल. गोर गरीब शेतकरी वर्ग सक्षम करणे यातच खरी आपल्या देशाची आधुनिक प्रगती होईल! मोठ मोठी भाषण बाजी करण्यापेक्षा कृती करण्याची आता गरज आहे.तरच देशात "शिवशाही" नांदेल! घरोघरी जाऊन वर्गणी गोळा करुन जयंती साजरी करण्यापेक्षा स्वतःच्या ताकतीने महाराजांचे विचार प्रत्येक घराघरात रुजवण्यासाठी कार्य करुयात. वर्गणी गोळा करण्यात जयंती नसुन महाराजांचे विचार सर्व जाती धर्माच्या लोकांमध्ये पोहचविण्यात खरी जागृती आहे.त्यामुळे शिवरायांच्या विचारांची जागृती घडवून आणण्यासाठी शिवजयंतीचा दिवसच नव्हे प्रत्येक दिवस हा त्यांच्या विचाराने कार्य करत राहुयात.शिवजयंतीची संकल्पना ही 'शिवशाही निर्माण करणारा संकल्प निर्माण करुयात... जय शिवराय.

# शिवरायांचा इतिहास सदैव प्रेरणादायी!

आधुनिक केसरी

***हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरणादायी इतिहास आपण या लेखात अभ्यासणार आहोत.संपूर्ण विश्वामध्ये 19 फेब्रुवारी हा दिवस अतिशय आनंदाने, उत्साहाने साजरा केला जातो, कारण छत्रपती शिवाजी महाराज यांची साडेतीनशे वर्षानंतरही जयंती तेवढ्याच जोमाने, ताकतीने, धुमधडाक्यात आजही साजरी केली जाते. कारण काय असेल? त्यासाठीच हा लेखन प्रपंच..... छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मापूर्वीची जी सामाजिक परिस्थिती होती ती परिस्थिती त्यांच्या जन्मानंतर राहिली नाही. ज्या परकीय सत्ता या ठिकाणी आक्रमण करत होत्या त्या सत्तांना पळून लावण्याचे काम महाराजांनी केले. आणि आपल्या स्वराज्यातील रयतेला मानवता शिकवली म्हणूनच त्यांचा जन्मोत्सव आपण साजरा करतो. तसेच आपल्या समाजामध्ये अनेक अंधश्रद्धा, रूढी ,परंपरा, प्रथा, वेडगळ समजुती या तुंडूब भरलेल्या आहेत परंतु हे शिवाजी महाराजांनी सर्व बाजूला सारलं. सतीची चाल ही पूर्वीपासून चालत आली होती.***

खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांनी मातोश्री आईला म्हणजेच जिजाऊ साहेबांना सती जाण्यापासून थांबवले. ही क्रांतिकारी घटना त्या काळात घडली आणि तेव्हापासून जवळजवळ सतीची प्रथा बंदच



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

झाली ही क्रांतिकारी घटना होती, म्हणून आपल्याला शिवजन्मोत्सव साजरा करावा वाटतो ,तसेच अंधश्रद्धेबद्दल बोलायचं झाल्यास मनाच्या अंधश्रद्धा आहेत काही लोकांनी त्या सुरू ठेवलेल्या आहेत. निरक्षरतेचा फायदा घेऊन या केल्या जातात म्हणून त्यांनी कोणत्याही लढाईला जाते वेळेस अमावस्येच्या रात्री ते जात होते. यामुळे हे शकुन अपशकुन थोतांड आहे हे आपल्याला समजते, आपल्या अंतःकरणातून कळते ,परस्त्रीला मातेसमान मानावे, कल्याणच्या सुभेदाराची सून सैनिकांनी महाराजा पुढे आणून उभी केली; परंतु त्या मातेला त्यांनी परत त्यांच्या घरी नेऊन सोडावे, त्यांना साडी चोळी बांगडी करून जमिनीचा तुकडा दिला ही मनाची श्रीमंती व स्त्रीबद्दल आदर त्यांच्याकडे होता, परस्त्रियांचा त्यांनी सन्मान केला होता. म्हणूनच आपल्याला त्यांचे स्मरण होते.
असे मला या ठिकाणी सांगायचे आहे.
धार्मिकतेबद्दल बोलायचे असल्यास सर्वधर्म एक आहेत याची शिकवण त्यांनी दिली. सर्व मानव एक आहेत. वतनदारी, जहागिरी पध्दत बंद करून त्यांनी रोख रक्कम सैनिकांना दिली होती ,यामुळे सर्वांना समानता आली होती, अहंकार आणि गर्व नाहीसा झाला होता , गुणवंताना त्यांनी त्यांचे गुण पाहून स्वराज्यामध्ये मावळे म्हणून एकत्रित केले. आणि स्वराज्य निर्माण केले. त्यामुळे कोणत्याही धर्माला त्यांनी अधिकृत धर्म मानला नाही. सर्वधर्म सारखे आहेत ही शिकवण त्यांच्या पासूनच मिळते. त्यासाठी हा शिवजन्मोत्सव साजरा करावा असं प्रत्येकाला वाटते ,म्हणूनच घराघरातून, शाळा महाविद्यालयातून, वेगवेगळ्या पतसंस्थानातून ,गड किल्ल्यातून सर्व कर्मचारी, शासकीय, प्रशासकीय ऑफिस मधून, निमशासकीय सेवेतील लोकांकडून आबालवृद्धांकडून तेवढ्याच उत्साहाने हा शिवजन्मोत्सव साजरा करावा असे प्रत्येकालाच वाटते.



भारत हा कृषिप्रधान देश आहे येथील शेतकरी सुखी राहायला पाहिजे. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये असे त्यांनी सैनिकांना ताकद दिली होती. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे त्याच्या शेतातलं पीक जर तुडवण्यात गेले तर तो खाईल काय? म्हणून शेतकऱ्यांना त्रास देऊ नये असे त्यांनी सक्त ताकीद दिली होती. शेतीची पुन्हा मोजणी करून घेतली होती ,पर्यावरणाची काळजी घेऊन झाडे लावा झाडे जगवा.जे वाळलेले लाकूड आहे त्याचा उपयोग करा. ते विज्ञानवादी होते, त्यामुळेच तर त्यांनी त्या काळात पर्यावरणाचे महत्त्व विशद केले होते ,आज्ञापत्रातून ते सांगतात म्हणून तो विचार आज आपण तंतोतंत पाळतो खरोखर आज तापमान वाढत आहे. जर वृक्ष नसले तर काय झालं असते? हे आठवण शिवरायांच्या आज्ञापत्रातून पर्यावरणामधून आज आपल्याला कळते म्हणून आपण त्यांचा जन्मोत्सव साजरा करतो, आदिलशाही, कुतुबशाही ,मुघलशाही, व-हाडशाही इमादशाही या सर्वांना त्यांनी जसेच्या तसे उत्तर देऊन माघारी पाठविले. आपले आरमार जोपर्यंत मजबूत नाही तोपर्यंत आपल्याला केव्हाही परकीय सत्ता आपल्या वर हल्ला करू शकतात म्हणून त्यांनी दौलतखान सारख्या महान व्यक्तीला आरमाराचे प्रमुख बनविले आणि इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज यांना ताकीद दिली त्यामुळे आज आपली किनारपट्टी सुरक्षित आहे, असे म्हणता येईल. महाराजांनी सुरतेला बेसुरत केले कारण धर्मांध असणाऱ्या शक्तीने पुण्यावर हल्ला केला होता त्याचा बदला म्हणून ठकास महाठक असे ते म्हणत होते. म्हणूनच त्यांनी दोन वेळेस सुरत लुटून अद्दल घडवली होती. पुढचा प्रसंग आग्रा येथील सुटका सांगायचे असेल तर किती चपळाईने त्यांनी सुटका करून घेतली. त्यानंतर नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी शिवचरित्र वाचून तसाच प्रसंग घडवून आणला आणि ते वेशांतर करून आपल्या देशात आले या अशा कितीतरी गोष्टी शिवाजी महाराजा कडून आपल्याला शिकायला मिळतात. 6 जून 1674 रोजी रायगडावर त्यांनी राज्याभिषेक करून घेतले, त्यामुळे हे हिंदवी स्वराज्याचे सार्वभौम राजे झाले. स्वतःची आपल्याला होन आणि शिवराई नाणी पाडली, राज्यव्यवहारकोश नावाचा ग्रंथ तयार करण्यात आला. आपली शक कालगणना तयार करण्यात आली नंतर त्यांनी दिग्विजय मोहीम काढून आपणही राजे आहोत हे संपूर्ण जगाला दाखवून दिले. त्यामुळे या सगळ्या गोष्टी आज आपल्याला प्रेरणादायी व स्फूर्ती वाढविणाऱ्या आहेत. म्हणून नीतिमत्ता, शौर्य, धैर्य ,चपळता धूर्तपणा हे गुण त्यांच्याकडून आपल्याला शिकता येतात ,सर्व जातींना एकत्रित घेऊन चालणारे ते महान राजे होते, आपल्या जीवनामध्ये आई-वडिलांना किती मान आहे. सन्मान आहे हे त्यांच्याकडून शिकावे, नेहमी लढायावर जाते वेळेस आई-वडिलांचा आशीर्वाद घेऊन ते जात होते, आईकडून त्यांनी अनेक विद्या शिकल्या, आई पेक्षा कोणीही या जगात मोठ दैवत नाही हे त्यांच्याकडून शिकावं म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ यांचे आपल्याला स्मरण होण्यासाठी आपण हा शिवजन्मोत्सव साजरा करत आहोत. जावळीचे चंद्रराव हे मुजोर आहेत, स्वराज्याच्या विरोधात जातात शत्रूसैनिकांना जाऊन भेटतात अशा जावळीच्या मोऱ्यांना त्यांनी अद्दल घडवली यातून कठोर शासन झाले, असे आपणास म्हणता येईल, माणसाला माणूस म्हणून उभे करण्यासाठी आपल्या आजीवन काळात त्यांनी कधीच आराम केला नाही म्हणून शिवाजी महाराज हे यशवंत, ज्ञानवंत, कीर्तीवंत जाणता राजा, राष्ट्रपालक, गोपालक , कुळवाडी भूषण, राजाधिराज ,संस्कृती रक्षक अशा कितीतरी उपाधींनी त्यांना संबोधता येते .महान योध्दा म्हणून त्यांना जगात ओळखले जाते. त्यांच्या जीवनामध्ये त्यांनी मानवतावादी विचार पेरले ,आपल्याला स्वाभिमान शिकवला ,अस्थिर असलेल्या लोकांना संघटित केले, परकीयांपासून आपला बचाव केला, वेळप्रसंगी शत्रू सोबत त्यांनी तह केले परंतु ते हरले नाहीत परत त्यांनी आपले गड किल्ले जिंकून घेतले यातून आपल्याला असा बोध होतो की वेळप्रसंगी दोन पावले मागे सुद्धा घेता यावेत ही शिकवण त्यांच्या आचरणातून मिळते ,लेकीबाळीची अब्रू वाचवली, शत्रूला सुद्धा हेवा वाटावे ,खरोखरच ते राजे होते म्हणून शत्रूंनी सुद्धा राजा असावा तर शिवबा सारखा असे म्हणून मुक्तकंठाने प्रशंसा केली, म्हणून त्यांचे संपूर्ण जीवन हे संघर्षमय असून आपणास सदैव प्रेरणादायी आहे त्यासाठीच आपण त्यांचा जन्मदिन मोठ्या उत्साहाने साजरा करत आहोत. आजची परिस्थिती पाहता आपण दुसऱ्यासाठी काय करत आहोत ? याचा तरुणांनी विचार करावा, छत्रपती शिवाजी महाराजांचे गुण आपल्या अंगी येण्यासाठी आपल्याला काय करता येईल? हे अगोदर अभ्यासावे, फक्त एक दिवस जयंती साजरी करून त्यांचे गुण आपल्या अंगी येणार नाहीत याची काळजी घ्यावी, परस्त्रियांना मातेसमान मानून, वडीलधाऱ्या व्यक्तींचा मान राखून ,शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव देऊन, गुन्हेगारांना शिक्षा देऊन फितुरांना अद्दल घडवून ,सर्वजण आपण गुण्यागोविंदांने नांदावे, तेव्हा ही शिवजयंती यशस्वी झाली असे आपल्याला म्हणता येईल आणि तेव्हाच खरे समाधान मिळेल, शिवजन्मोत्सवाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

# माऊली सेवा दलाकडून माणसे जोडणारे कार्य

## तरडगावात राबवले जातात विविध उपक्रम

आधुनिक केसरी

***महाराष्ट्राच्या मातीत जनहिताचे कार्य करणाऱ्या संत परंपरे पासून ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श तसेच मानव हिताच्या दृष्टीने काम करणाऱ्या सर्वच समाज सुधारकांच्या विचारांनी प्रेरीत होऊन माणूस हा जिवंत प्राणी महत्वाचा मानून माणसांच्या एकीतून माणसांच्या भल्याच्या दृष्टीने कार्य करण्यासाठी फलटण तालुक्यातील तरडगांवचे माऊली सेवा दल हे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे.गेल्या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यापासूनतरडगांव मधील विविध जाती धर्मातील लोकांचे संघटन हे माऊली सेवा दलाच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे.माऊली सेवा दलाचे संस्थापक अध्यक्ष सतिश ज्ञानोबा गायकवाड यांच्या मार्गदर्शनातून विविध उपक्रम राबविले जात आहेत.त्यांच्या समवेत काम करणाऱ्या सहकाऱ्यांचे त्यांना चांगलेच सहकार्य मिळत आहे.***

महाराष्ट्रात स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्व जाती धर्मातील मावळ्यांना एकत्र आणून जे स्वराज्य निर्माण केले ते प्रजेच्या हिताचे बनले.आज छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श घेऊन आपण सुद्धा समाज हिताचे कार्य केले पाहिजे.अशी भावना माऊली सेवा दलाचे संस्थापक अध्यक्ष सतिश गायकवाड नेहमी व्यक्त करत असतात.छत्रपती शिवाजी महाराज यांचाच आदर्श घेऊन हे कार्य सुरू आहे.



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

माऊली सेवा दलाच्या कार्यातून आम्हाला माणसं जोडायची आहेत.इथली माणसे एकत्रित येऊन जो संवाद घडत असतो.त्यातूनच खऱ्या अर्थाने विविध उपक्रम हाती घेण्याचा प्रयत्न होत असून माणसे जोडत राहणे.हीच आमची खरी श्रीमंती आहे.असे सतिश गायकवाड नेहमी म्हणत असतात.याच प्रेरणेतून अनोखे कार्य करण्याची संधी आम्हा सर्वांना एकमेकांच्या सहवासातून मिळत असते.हा माणसं जोडण्याचा विचार प्रत्यक्ष कृतीत घेऊन जाण्याचे कार्य हे सतिश गायकवाड आणि माऊली सेवा दलाच्या कृतीशील कार्यातून घडत आहे.

अनेक विचारांची लोकं एकत्र आणणं किंवा संघटन तयार करणं सोपं नसतं.परंतु सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र आणून जे माऊली सेवा दलाकडून कार्य केले जाते आहे.ते अत्यंत महत्वाचे अन मोलाचे व सामाजिक बांधिलकी जपणारे कार्य केले जात आहे.माणसं एकत्र आली पाहिजेत.

माणसा माणसामध्ये संवाद घडला पाहिजे.

विचारांची देवाण घेवाण झाली पाहिजे.त्यातूनच समाज हिताच्या नव नव्या संकल्पना उदयास आल्या पाहिजेत.हा विचार माऊली सेवा दलाचा आहे.हा विचार कायम जपण्याचा प्रयत्न सतिश गायकवाड व त्यांचे सर्व सहकारी करत आहेत.

गावालाच नव्हे तर समस्त पंचक्रोशीला कौतुक वाटावे असे कार्य माऊली सेवा दल करत आहे.

माऊली सेवा दलाकडून आजपर्यंत अनेक प्रेरणादायी कार्य केली गेली आहेत. माऊली सेवा दलाकडून स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धनाचे कार्य घडत आहे.अनेक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आलेले आहेत.गावच्या मुख्य प्रवेशद्वारा पासून ते संपूर्ण गावातून भल्या मोठया कुंडया मध्ये झाडे लावण्यात आलेली आहेत. आपलं तरडगाव हे सुशोभित दिसले पाहिजे. म्हणून गावात रस्त्याच्या दोन्ही बाजूने ठीक ठिकाणी, विशिष्ट अंतरावर झाडांच्या कुंड्या ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे गावांत प्रवेश करताना सुद्धा वृक्षमय असेच वातावरण निर्माण झालेले आहे.वृक्षारोपणा सोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी सुद्धा माऊली सेवा दलाकडून पेलली जात आहे.वृक्ष कार्यावर विशेष भर देण्यात आलेला आहे.ज्या कोणाचा वाढदिवस असेल अशा प्रत्येक व्यक्तिच्या घरी माऊली सेवा दलाचे पदाधिकारी जाऊन अनोख्या पद्धतीने शुभेच्छा देत असतात. यावेळी वृक्ष देऊन त्यांचा सत्कार केला जात असतो.वृक्ष देणे ही एक चांगली प्रथा सुरू केलेली असून या संकल्पनेचे विशेष कौतुक होत असते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या किंवा विविध पदांवर निवड झालेल्या व्यक्तींचा ही सन्मान केला जात असतो.एखादा मुलगा किंवा मुलगी एखाद्या परीक्षेतून यश मिळविले तरी माऊली सेवा दल सत्कार करत असते.पाठीवर कौतुकाची थाप देण्याचा प्रयत्न केला जात असतो.माऊली सेवा दलाच्या कार्याची सुरूवात ज्या सेवेने झाली ती सेवा म्हणजे स्वच्छता अभियान सेवा होय.हे कार्य करत असताना माऊली सेवा दल विशेष प्रकाश झोतात आली.गावांतील परिसर हा स्वच्छ आणि सुंदर राहण्यासाठी माऊली सेवा दलाने हातात खराटा घेत गावातील स्वच्छता मोहीमेला सुरुवात केली.दर रविवारी एकत्र येत स्वच्छता मोहीम राबविणे,एखादे ठिकाण निवडून त्या ठिकाणची स्वच्छता करणे हे सुद्धा कार्य माऊली सेवा दलाकडून करण्यात आले.गावातील धार्मिक स्थळांना भेटी देत साफ सफाई करण्याचे कार्य सुद्धा माऊली सेवा दलाने केलेले आहे. पंढरपुर असेल आळंदी असेल किंवा बालाजी मंदिर असेल आदी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आलेली आहे.तेथील ट्रस्टकडून सुद्धा माऊली सेवा दलाच्या कार्याचे कौतुक करण्यात आलेले आहे. गावात स्वच्छता मोहीम राबविल्याबद्दल ग्रामस्थांकडून सुद्धा माऊली सेवा दलाच्या या कार्याला विशेष धन्यवाद दिले जात असतात.

लोकांनी अजून एकत्रित यावे.म्हणून सद्यस्थितीत एका नव्या उपक्रमास सुरुवात करण्यात आलेली आहे.शारीरिक हालचाल किंवा शारिरीक तंदुरुस्तीसाठी ढोल लेझीम च्या माध्यमातून दररोज सायंकाळच्या दरम्यान आनंद घेतला जात आहे.

लोकं एकत्र येत यांमध्ये सहभागी होत आहेत.

दिवसभर स्वतःची कामे पूर्ण झाल्यानंतर संध्याकाळच्या दरम्यान पालखी तळावर ढोल लेझिमच्या तालावर खेळ खेळत असतात.ढोल लेझीमचा आवाज गुंजत असतो.या उपक्रमाच्या माध्यमातून लोक एकत्र येत आहेत,लोकं संवाद साधत आहेत.एकमेकां सोबत विचारांची देवाण घेवाण केली जात आहे.यातूनच खऱ्या अर्थाने माणसं जोडली जात आहे.म्हणून माऊली सेवा दलाकडून अनेक कार्य घडत असले तरी माणसे जोडणारं कार्य हे महत्त्वाचे ठरू लागले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज: आधुनिक भारताचे निर्माते

आधुनिक केसरी

***हिंदवी साम्राज्याचे संस्थापक आणि एक आदर्श शासनकर्ता म्हणून ओळखले जाणारे छत्रपती शिवाजीराजे भोसले एक सर्वसमावेशक, सहिष्णू राजा म्हणून महाराष्ट्रात आणि इतरत्रही वंदिले जातात. शत्रूविरुद्ध लढ्याकरता महाराष्ट्रातल्या डोंगर-दऱ्यांमधे अनुकूल असलेली गनिमी काव्याची पद्धत वापरून त्यांनी तत्कालीन विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही आणि बलाढ्य मुघल साम्राज्यशाही ह्यांच्याशी लढा दिला, आणि मराठी साम्राज्याचे बीजारोपण केले. आदिलशाही, निजामशाही आणि मुघलसाम्राज्य बलाढ्य असली तरी महाराष्ट्रात त्यांची सगळी भिस्त स्थानिक सरदारांवर आणि किल्लेदारांवर होती. ते सरदार/ किल्लेदार जनतेवर अन्याय-अत्याचार करत असत. शिवाजीमहाराजांनी त्या अन्याय-अत्याचारातून जनतेची सुटका केली, आणि उत्तम शासनाचे एक उदाहरण भावी राज्यकर्त्यांसमोर ठेवले.***

छत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाचा व कारकीर्दीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला असता काही गोष्टी समोर येतात. शौर्य, पराक्रम, शारीरिक सक्षमता, ध्येयवाद, कुशल संघटन, कडक व नियोजनबद्ध प्रशासन, मुत्सद्दीपणा, धाडस, द्रष्टेपणा असे उच्च कोटीचे गुण महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात एकवटलेले दिसतात.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

यांशिवाय छत्रपती शिवाजी महाराज हे एक महान योद्धे तर होतेच, पण ते एक कार्यक्षम आणि सक्षम प्रशासकही होते. प्राचीन भारतीय परंपरा आणि समकालीन शासन पद्धती यांचा समन्वय साधून त्यांनी ठोस तत्त्वांच्या आधारे आपली शासन व्यवस्था विकसित केली. त्याच्या प्रशासकीय क्षमतेमुळेच जिंकलेल्या भागातील रहिवाशांनीही त्यांना आपला अधिपती म्हणून मनापासून स्वीकारले. शिवाजी महाराजांची राज्यपद्धती लोकाभिमुख होती. तो निरंकुश शासक म्हणून न राहता लोककल्याणकारी शासक म्हणून आपल्यासमोर दिसतो. एक शासक म्हणून जो आपल्या प्रजेचे कल्याण सर्वोपरि ठेवतो. त्यांच्या कारभारात लोकशाहीची बीजे होती. खरे तर भारतीय न्यायिक परंपरेवर आधारित सरकारी व्यवस्था विकसित करणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. प्रशासक म्हणून त्यांनी कधीही अधिकारांचा दुरुपयोग केला नाही. राजापेक्षा राज्याच्या हिताशी अधिक निष्ठावान असलेल्या आपल्या सैनिक-सहकाऱ्यांना त्याने बक्षीसही दिले. अशी अनेक उदाहरणे शिवाजी महाराजांच्या जीवनात पाहायला मिळतात. स्वैराचार किंवा मक्तेदारी विकृती आणते. यामुळे राजा मनमानी करतो. त्या काळातील बहुतेक राजे किंवा सम्राट निरंकुश प्रवृत्तीने ग्रस्त होते. शिवाजी हा जगाच्या इतिहासातील पहिला शासक होता ज्याने स्वतःच्या सत्तेचे विकेंद्रीकरण केले. आज चांगल्या व्यवस्थापनाचा धडा शिकवला जात असताना जबाबदाऱ्यांच्या विकेंद्रीकरणाचा मुद्दा सर्वोच्च ठेवला जातो. माणसाचे स्वतःचे गुण आणि तोटे असतात, स्वतःची बलस्थाने आणि कमकुवतता, आवडी-निवडी, स्वतःच्या विचार क्षमतेच्या मर्यादा असतात, हे सत्य शिवाजीला चांगलेच माहीत होते. तो त्या कमकुवत प्रशासकांसारखा नव्हता, ज्यांना प्रत्येक क्षणी आपली शक्ती आणि अधिकार गमावण्याची भीती वाटत होती.

शिवाजी महाराजांनी निवडक तज्ज्ञांकडून 'राजव्यहार कोश' नावाचा अधिकृत पारिभाषिक शब्दकोष तयार केला होता. हे त्याच्या तेज आणि बुद्धिमत्तेचे प्रतिबिंब आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी सरकारी कामात मदत करण्यासाठी आठ मंत्र्यांची एक परिषद तयार केली होती, तिला अष्टप्रधान असे म्हणतात. कर्तृत्व, कर्तव्यनिष्ठा, सचोटी, प्रामाणिकपणा आणि शौर्य हेच निकष त्यांच्या मंत्रिमंडळात कोणाला तरी समाविष्ट करण्यासाठी होते. तत्कालीन प्रवृत्तीच्या विपरीत, मंत्रीपदासाठी आनुवंशिकता अनिवार्य नव्हती. 'पेशवे' हे त्या मंत्रिमंडळाचे प्रमुख होते. 'अमात्य' हा अर्थ आणि सरकारचा कारभार पाहत होता. राजाचा पत्रव्यवहार आणि इतर सरकारी कामं 'सेक्रेटरी' सांभाळत असत. ज्यामध्ये शाही शिक्का बसवणे आणि करारांचे मसुदे तयार करणे देखील समाविष्ट होते. विविध प्रकारची माहिती व गुप्त माहिती गोळा करून त्याची पडताळणी करणे, राज्यात घडणाऱ्या घटना व घडामोडींवर बारीक लक्ष ठेवणे, बातम्यांचे संकलन करून त्याकडे महाराजांचे लक्ष वेधणे हे 'मंत्र्या'चे मुख्य काम होते. त्याने राजाची डायरी ठेवली. त्याला अतिरिक्त खर्चाबाबत राजाला प्रश्न विचारण्याचा अधिकार होता. जरा विचार करा, आजचे कर्मचारी आपल्या अधिकाऱ्यांकडून किंवा प्रमुखांकडून उत्पन्न आणि खर्चाचा तपशील मागू शकतात का? 'सुमंत' परराष्ट्र व्यवहार पाहत असे आणि आजच्या परराष्ट्र मंत्र्यासारखीच कामेही त्यांनी पार पाडली. राजाचा मुख्य प्रतिनिधी किंवा वार्ताहर म्हणून त्याने इतर राज्यांत वाटाघाटी केल्या. 'सेनापती' हे सैन्याचे प्रमुख होते. सैन्यात सैनिक नेमण्याचे सर्व अधिकार त्यांना होते. लष्कराचे



संघटन, शिस्त, रणांगणातील तैनाती आदींचीही जबाबदारी त्यांच्यावर होती. धार्मिक बाबी आणि अनुदानाची जबाबदारी 'पंडितराव' यांच्यावर होती. 'न्यायाधीश' हे न्यायिक प्रकरणांचे प्रमुख होते. प्रत्येक सरन्यायाधीशांना मदत करण्यासाठी अनेक लहान-मोठ्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त, "दवाण, मजमुदार, फडणीस, सबनीस, चिटणीस, जमादार आणि पोतनीस" असे आठ मोठे अधिकारी होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःची राज्यघटना तयार केली होती, म्हणजे आजच्यासारखी शासनसंहिता. त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण आणि शासनाच्या लोकशाहीकरणाला प्रोत्साहन दिले. माणूस कितीही सक्षम आणि सामर्थ्यवान असला, तरी तो सुसूत्रता असलेल्या यंत्रणेशिवाय व्यवस्था चालवू शकत नाही, हे त्यांना चांगलेच ठाऊक होते. त्यामुळे त्यांचा भर व्यक्तीकेंद्रित शासनप्रणालीऐवजी व्यवस्थेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्यावर होता. स्वतः शासक असूनही त्यांनी अप्रत्यक्षपणे सरंजामशाहीला मुळापासून नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आज घराणेशाहीचा वारसा सर्वच पक्ष आणि नेत्यांनी जोपासला आहे, हे पाहता शिवरायांचा हा आदर्श इतका उच्च आणि दुर्मिळ वाटतो! ते स्वतःला राज्याचे मालक न मानता विश्वस्त मानत. ते देवाला राज्याचा स्वामी मानत. राज्यकारभाराच्या सोयीसाठी त्यांनी जिंकलेल्या प्रदेशांची 'स्वराज' नावाच्या चार प्रांतांमध्ये विभागणी केली. प्रत्येक प्रांताच्या 'सुभेदार'ला 'प्रांतपती' म्हणत. त्यांची गावाची आठ सदस्यीय समिती होती. प्रत्येक गावात एक 'प्रमुख' होता. त्याच्या काळात तीन प्रकारचे कर प्रचलित होते. 'जमीन कर, चौथ आणि सरदेशमुखी.' शेतकऱ्यांकडून केवळ जमीन कर वसूल केला जात होता, हे विशेष. गरीब शेतकऱ्यांकडून त्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ आणि उत्पादनाच्या आधारे कर वसूल केला जात असे. त्याच्या राज्याचे सर्व सैनिक, अधिकारी, सरदार, मंत्री इत्यादी पगारदार होते. त्याच्यासारखी सुनियोजित आणि समृद्ध पगार व्यवस्था इतर कोणत्याही राजाने प्रभावीपणे राबवली नव्हती. शिवाजीची ही दूरदृष्टी भ्रष्टाचार आणि घोटाळ्याला आळा घालण्यासाठी उपयुक्त ठरली.

शिवाजीने सैन्य स्वराज्याच्या मध्यवर्ती प्रशासनाखाली घेतले आणि त्यांना पगार देण्यास सुरुवात केली, त्याचा आनंददायी परिणाम असा झाला की सैनिकांची निष्ठा व्यक्तींप्रती नसून राष्ट्र-राज्याप्रती होती. सामाजिक स्तरावरही त्यांनी अनेक बदल घडवून आणले. नेताजी पालकर, बजाजी निंबाळकर यांसारख्या धर्मांतरित योद्ध्यांचे धर्मग्रंथाद्वारे हिंदू धर्मात रूपांतर करण्यात आले. त्यांनी केवळ त्यांना परत घेतले नाही तर त्यांच्याशी त्यांचे कौटुंबिक संबंध प्रस्थापित केले आणि त्यांच्या घरी परतण्यासाठी त्यांना सामाजिक मान्यता दिली. त्याने त्याच्या वेळेच्या पुढे विचार केला. त्यामुळे अरबस्तान आणि युरोपातील आधुनिक कला आणि युद्ध तंत्राचा अवलंब करण्यात त्यांनी अजिबात संकोच दाखवला नाही. छपाई, छापखाना, तोफखाना, तलवारी इत्यादी कला त्यांनी हाती घेतल्या. नौदलाची निर्मिती करून त्यांनी सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, पद्मदुर्ग, विजयदुर्ग असे जलदुर्ग बांधले. एकूणच, त्यांनी काळाला साजेशी सर्वसमावेशक शासन व्यवस्था निर्माण केली. आणि या सर्व उदाहरणांच्या आणि घटनांच्या प्रकाशात असे म्हणता येईल की शिवाजी हे आधुनिक भारताचे खरे निर्माते होते.

# कुळवाडीभूषण : छत्रपती शिवाजी महाराज

आधुनिक केसरी

***खरं तर महाराष्ट्र ही पुण्यभूमी. अनेक साधुसंत, विचारवंत,पराक्रमी योद्धे आणि समरवीरांच्या भक्ती व शक्तीने पवित्र व पुनित झालेली ही पवित्र माती. अनेक गौरवशाली राजपरिवारांनी महाराष्ट्राला सुजलाम् सुफलाम् बनवले होते. जनता सुखी होती पण या आनंदाला दृष्ट लागली. इ. स. १२९३ साली एक भयंकर टोळधाड महाराष्ट्रावर कोसळली. खिलजीने देवगिरीचे यादव साम्राज्य बुडवले आणि महाराष्ट्र गुलामगिरी मध्ये ढकलला गेला. पुढे सर्व सुलतान व बादशहांच्या काळातही हीच गुलामगिरी आमचे नशीब बनत राहीली. वतनदार, जहागिरदार व सुभेदार यांनी उच्छाद मांडला होता. शेतीची नासाडी करणे, धान्य उचलून नेणे, स्त्रियांना बाटवले आणि पुरूषांना गुलाम बनवणे यासारख्या अन्यायी अत्याचारांनी कळस गाठला होता. त्याचवेळी एक राजमन मात्र या अन्यायाविरुद्ध पेटून उठत होते. ते मन होतं भोसले कुळाची राजवधू राष्ट्रमाता जिजाऊ साहेबांचे. अखेर स्वराज्य स्वप्न त्यांच्या हृदयात अंकुर बनले आणि दिवस उजाडला फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१ (१९ फेब्रुवारी १६३० ) चा. महाराष्ट्राच्या मातीवरती, सह्याद्रीच्या कड्यावरती अन् शिवनेरीच्या चिर्यावरती अन्याय, अत्याचार आणि बेबंदशाहीचा बीमोड करणारा सुर्य जन्माला आला. नव ठेवले शिवबा.***



प्रा. संजय टाक
संपर्क क्र.: ९८८१९८१४३६

शिवबा या सह्याद्रीच्या दरी- खोर्यात खेळू आणि बागडू लागले. जिजाऊ माँ साहेबांच्या संस्कारांनी त्यांच्या मनात स्वराज्य निर्मितीचे पडघम वाजू लागले. बाल वयातच शंभु महादेवास साक्षी ठेवून राजांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली, त्यावेळी बरोबर होती बारा मावळ प्रांतातील अन् अठरा पगड जातीतील सामान्य घरातील पोरं- टोरं. पण याच सामान्य घरातील माणसांच्या असामान्य कार्यातून आणि झुंजण्यातून स्वराज्य उभा राहिले. राजांनी सुरवातीला 'तोरणा' किल्ला घेतला आणि श्री गणेशा केला. नंतर कोंढाणा, पुरंदर अशी घौडदौड सुरू झाली. तेव्हा सुरवातीस स्वराज्य नि्मितीच्या चळवळीला गुंडगिरी, पुंडगिरी म्हणून चिडवले जात होते. तेच पुढे इ. स. १६६० ते १६७० च्या दरम्यान शत्रू राजांना मोठा बंडखोर संबोधू लागले होतेहोते आणि १६७४ ला राज्याभिषेकानंतर सर्व शत्रूंना ( मोगल,आदिलशाही,इंग्रज,पोर्तुगीज ,हबशी आदि. ) साक्षात्कार झाला अन् 'शिवाजी राजा मोठा धोरणी आहे' असे वाटू लागले होते. राजांनी प्रथम वतनदारी, जहागिरदारी वरती घाव घातला. मराठी मन व मनगटाला दिशा दिली. सरंजामशाहीच्या गढ्या काढून घेऊन त्यांना रयतेबरोबर राहण्यास भाग पाडले. त्यांचे सैन्य काढून घेउन स्वराज्यात सामील केले. ओसाड व उजाड गावांना पुन्हा वसवले. शेतकर्यांना जमीनी कसण्यासाठी वहिवाट करून दिल्या. कौल देउन गावे वसवली. बैल व नांगर देऊन शेती समृद्ध केली. त्यामुळे इथली रयत आनंदली. लाखांचा पोशिंदा या स्वराज्याच्या महादेवासाठी जान कुर्बान करती झाली. अफजलखान वधानंतर राजांची किर्ती वाढली तसे शत्रू ही वाढले. राजांची गंभीर दखल घेऊन मोगल दरबारातून शाहीस्ताखानास शिवाजीराजांचा बीमोड करण्यास पाठवण्यात आले. पण राजांनी 'सर्जिकल स्ट्राइक' करत खानाची बोटे उडवलीउडवली आणि भारतवर्षात जुलमी सत्तांना एक प्रकारे धडकीच भरवली. पुढे एकीकडे सिद्दी जौहर व दुसरीकडे मिर्झा राजे जयसिंग अशी संकटे येताना त्यांनी आदिलशाहीशी सलोखा साधताना मिर्झा राजेंशी तह केला. संकटसमयी दोन पावलं मागे यावे हे सुद्धा शिवचरित्रातून शिकण्यासारखे आहे. तहानुसार ते शंभू राजांना घेऊन आग्रा येथे जातात व मोगल दरबारात क्षात्र तेजाचे दर्शन घडवतात. हे सर्व 'याची देही याची डोळा' पाहणारा कवी भूषण शिवाजी



राजांचे वर्णन करतो -

**इन्द्र जिमि जंभ पर, बाडब सुअंभ पर,**
**रावन सदंभ पर, रघुकुल राज हैं।**
**पौन बारिबाह पर, संभु रतिनाह पर,**
**ज्यौं सहस्त्रबाह पर राम-द्विजराज हैं॥**
**दावा द्रुम दंड पर, चीता मृगझुंड पर,**
**'भूषन वितुंड पर, जैसे मृगराज हैं।**
**तेज तम अंस पर, कान्ह जिमि कंस पर,**
**त्यौं मलिच्छ बंस पर, सेर शिवराज हैं|**

शिवरायांनी धर्म संस्थापना कार्य सिद्धीस नेले. हिंदुस्थान ला आदर्श युद्ध नीती दिली. सत्य व अहिंसा यांची पुनः प्रतिष्ठापना केली. नेताजी पालकर यांचे 'कुली खान' चे धर्मांतर केले आणि पुन्हा हिंदु धर्मात आणले. माता जिजाऊंना सती जाण्यापासून रोखले अन् यातून धर्माचा नवा प्रवाह निर्माण केला. सर्व सामान्य टाळ वाजवणारे हातात तलवार दिली आणि भक्ती- शक्तिचा संगम साधला. 'हर हर महादेव' ची गर्जना सह्याद्रीच्या कड्या- कपारीत गुंजू लागली आणि स्वराज्याचा भगवा ध्वज डौलाने फडफडू लागला. राजांनी पर स्त्रीस मातेचा दर्जा दिला. सर्व धर्मियांना मानाचे स्थान दिले. रयतेवरच्या अन्यायाचा त्वरित बीमोड केला. म्हणून लोकांना हे राज्य आपले वाटू लागले. इ. स. १६७४ मध्ये यादव साम्राज्याच्या अस्तानंतर पुन्हा ऐत्तदेशियांचे 'स्वराज्य' विधिवत स्थापन झाले. शिवाजी राजे हे ' छत्रपती शिवाजी महाराज' म्हणून अभिषिक्त झाले.

एकिकडे स्वतः च्या तख्त वाचवण्यासाठी सैनिक व जनतेला बळी पाडणारे अन्यायी शासनकर्ता होते त्याच काळात ' लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे' हा विचार करून आपले प्राण बिल्वपत्राप्रमाणे 'शिवराय' रुपी महादेवास अर्पण करणारे बाजी, मुरारबाजी अन् तानाजी सारखे लढवय्ये होते. आजही सह्याद्रीच्या मातीत अन् नद्यांच्या पाण्यात या पराक्रमाचा सुगंध दरवळतो आहे. आपणही भावी पिढ्यांना राष्ट्राभक्ती व मानवतेचे ' शिव संस्कार' द्यायला हवेत. तीर्थ स्थानांच्या यात्रेप्रमाणे स्वराज्य तीर्थ स्थानांच्यायात्रा मुलांना व कुटुंबांना घडवायला हव्यात. यातूनच राष्ट्र उन्नती व राष्ट् उद्धारासाठी शक्ती मिळेल. या शिवजयंती दिनी सक्षम व संस्कारित समाज निर्मितीचा संकल्प व कार्यारंभ हीच शिवरायांना खरी आदरांजली ठरेल. जय शिवराय !

## चालत्या वाहनात युवतीचा विनयभंग



आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** कॉलेजमधून घरी जात असताना बुलेरो मधील चार ते पाच जणांनी फिर्यादी महाविद्यालयीन युवतीचा विनयभंग केल्याची १७ फेब्रुवारी शनिवारी सायंकाळी दे राजा ते मेहुणा दरम्यान घडली.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार तालुक्यातील मेहुणा राजा येथील युवती एग्रीकल्चर कॉलेज सुटल्यानंतर घरी जात असताना एक पांढरे रंगाची बुलेरो वाहन क्रमांक एम एच ३०ए एफ ९२२८ मध्ये बसली असताना वाहनातील चार ते पाच जणांनी वाईट उद्देशाने खिशातून पैसे काढून वाईट उद्देशाने हात इशारे केले. त्यांचा वाईट उद्देशाने व पळवून नेण्या विषयी खात्री पटल्यावर सदर युवतीने चालकास गाडी थांबविण्याचे सांगितले व गाडी खाली उडी घेतली. वाहनातून बाहेर रस्त्यावर उडी मारल्यामुळे फिर्यादीचे उजव्याL हाताला मनगटाला व इतर ठिकाणी जबर दुखापत झाली. शहरातील एका हॉस्पिटलमध्ये एक्स-रे काढले आता फ्रॅक्चर असल्याचे आढळून आले. डॉक्टरांची रिपोर्ट व फिर्यादी युवतीच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चार ते पाच जनाविरुद्ध विनयभंगासह इतर गुन्हा नोंदविला आहे. पोलीस हेडकॉन्स्टेबल कुटे तपास करीत आहे.

## शिरवळच्या किल्ले सुभानमंगलसाठी अच्छे दिन कधी येतील?

### स्वराज्याचा ऐतिहासिक वारसा टिकवून ठेवायचा आहे की नाही?

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** स्वराज्याच्या लढाईतील पहिला किल्ला हा सुभानमंगल भुईकोट शिरवळ (ता.खंडाळा) या परिसरात असून आजही ह्या किल्या कडे दुर्लक्ष आहे.हा किल्ला कायद्याच्या कचाट्यात अडकलेला आहे.ह्या किल्ल्याची दुरावस्था झालेली असून ह्या किल्ल्याचे संवर्धन तरी व्हावे म्हणून किल्ले प्रेमीं कडून वारंवार लक्ष वेधले जाते.परंतु ह्या किल्ल्याला कुणी वालीच उरलेला नाही.किल्ले सुभानमंगल साठी अच्छे दिन कधी येतील?असा सवाल उपस्थित होत आहे.१९ फेब्रुवारी जवळ आली की शिवजयंतीचा उत्सव हा मोठया उत्साहात साजरा होत असतो.सरकार सुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करत असते.परंतु ज्या स्वराज्यात किल्ल्याला अनन्यसाधारण महत्त्व असते.ते किल्ले संवर्धित करण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत. महाराष्ट्राचा गौरव करायचा असेल तर तो किल्ले संवर्धनातून करणे अपेक्षित आहे.गेल्याच वर्षी राज्य सरकारने जय जय महाराष्ट्र माझा हे गीत राज्य गीत म्हणून घोषित केले.ज्या महाराष्ट्राबद्दल एवढं गुण गाण केलं जातं.त्याच महाराष्ट्रातील किल्ले संवर्धित करण्यासाठी कधी पाऊले टाकली जाणार आहेत.असा सवाल सुद्धा उपस्थित होत आहे.सुभानमंगल किल्ला हा गेली अनेक वर्षांपासून दुर्लक्षित झालेला किल्ला आहे. हा किल्ला पुनर्जीवीत अवस्थेत आणावा.यासाठी शिवप्रेमी व किल्ले प्रेमी मागणी करत आहेत.परंतु या मागण्यांना कोणतेही महत्व दिले जात नाही.सुभानमंगल किल्ला हा शेवटची घटका मोजत असून हा किल्ला भविष्यात नामशेष होणार तर नाही ना?याची भीती शिवप्रेमींना लागून राहिली आहे.सुभानमंगल चे अस्तित्व अबाधित राहावे.म्हणून आजही संघर्ष चालू आहे.सुभानमंगल भुईकोट किल्ला हा स्वराज्य स्थापनेतील महत्वाचा किल्ला मानला जातो. इथे ८ ऑगस्ट १६४८ रोजी पहिली लढाई लढली गेली होती.ह्या लढाईतूनच किल्ले सुभानमंगल जिंकला होता.हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीसाठी इथूनच स्वराज्य स्थापनेचा पाया रचला होता.हा सुभानमंगल



किल्ला जीवित रहावा.या दृष्टीनेच गेली अनेक वर्षापासून संघर्षच संघर्ष सुरू आहे.परंतु या संघर्षास न्याय मिळेना.न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या शिवप्रेमींना अजून कितीकाळ संघर्ष करावा लागणार आहे.ना पुरातत्व खाते झटत आहे.ना सरकार,ना राजकीय नेते,ना प्रशासकीय यंत्रणा काहीच करताना दिसत नाही.हे असेच घडत राहणार असेल तर भविष्यात सुद्धा बाकीच्या किल्ल्यांच्या बाबतीत सुद्धा असेच होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. राज्य सरकार ऐतिहासिक महत्व जाणून घेऊन विविध घोषणा करत असते.छत्रपति शिवाजी महाराजांच्या संबंधित असलेल्या ऐतिहासिक वस्तू जपण्याचा प्रयत्न करत असते.परंतु किल्ले संवर्धनासाठी विशेष मेहनत घेतली जात नाही.पुरातत्व विभागाचे सुद्धा या किल्ल्यांकडे दुर्लक्ष झाल्याने किल्ले प्रेमी मात्र नक्की ही जबाबदारी कुणाची आहे.या संभ्रमात पडलेले आहेत. सुभानमंगल या किल्याने स्वराज्याला आकार दिलेला असुन आज त्याच सुभानमंगल चे अस्तित्व टिकविण्यासाठी नेत्यांनीच प्रयत्न करायला हवे आहेत. कारण नेत्यांच्या राजकारणातून अपेक्षित नसलेले अनेक निर्णय घडू शकतात, राजकीय स्वार्थ साधण्यासाठी राजकीय घडामोडी घडत असतात तर महाराजांच्या किल्ल्यांचे संरक्षण करण्यासाठी का तत्परता दिसून येत नाही.का महाराजांच्या किल्ल्याचे संवर्धन होऊ शकत नाही? असे अनेक सवाल उपस्थित होत आहेत.शिरवळ सह पंचक्रोशीतील शिवप्रेमीकडून वारंवार हा किल्ला पुढे आणला जात असतो.पत्रव्यवहार केले जात असतात.किल्ले स्पर्धेतून सुध्दा सुभानमंगल किल्ला बनविला जात असतो.परंतु ह्या किल्ल्यासाठी शिवप्रेमींची असणारी तळमळ अजूनही यंत्रणा व्यवस्था याना दिसेना. आज सुभानमंगल किल्ला हा खाजगी अतिक्रमणाने नष्ट होण्याच्या मार्गावर आलेला आहे.हा किल्ला जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेण्याचे निर्देश सुद्धा २०१८ ला जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.परंतु कायद्याच्या कागदपत्रात अडकलेल्या सुभानमंगल किल्ल्याकडे कोणीच जाण्यास तयार होत नाही.त्यामुळे आज ही इथल्या किल्ल्याला मोकळा श्वास मिळेना.इथल्या राजकीय पक्षास सुध्दा ही दुरावस्था थांबविता येत नसेल तर हे त्यांच्या निष्क्रिय आणि दुर्बळ पणाचे लक्षणच म्हणावे लागेल.इथे जे जे राजकीय पक्ष व नेते मंडळी महाराजांचे नाव घेऊन राजकारण करत आहेत. स्वराज्याचा ऐतिहासिक वारसा टिकवून ठेवायचा आहे की नाही? हे राज्यकर्त्यांनी लक्षात घ्यायला हवे.शिवरायांचे नाव घ्यायाचे परंतु किल्ले संवर्धन करण्यासाठी काहीच केले जात नाही.त्यामुळे कोणत्याच पक्षांना आणि नेत्यांना त्यांचे नाव घेण्याचा हक्क खरच उरतो का असे म्हणावे लागत आहे.

**गडकिल्ले संवर्धन समितीची निर्मिती होणे अपेक्षित** :गेली अनेक वर्षापासून खंडाळा येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष देशमूख हे सुभानमंगल किल्ल्या बाबत आवाज उठवत आहेत . शासन दरबारी या किल्याची व्यथा मांडत आहेत .अनेक किल्ले प्रेमी या किल्याच्या दूरावस्थेबाबत बोलत आहेत .परंतु आज तागायत हा प्रश्न जैसे थे तसाच आहे .संतोष देशमुख यांचे या किल्याकडे वारंवार लक्ष असते . त्यांनी गडकिल्ले संवर्धन समितीची निर्मिती होणे बाबत अपेक्षा व्यक्त केली आहे .ते म्हणतात की, सातारा जिल्ह्यातील गडकिल्ले संवर्धन होणे कामी सातारा जिल्ह्यात शासकीय गडकिल्ले संवर्धन समितीची महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महोदय तसेच कलेक्टर पालकमंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय समितीची निर्मिती होणे अपेक्षित आहे .असे सामाजिक कार्यकर्ते संतोष देशमुख यांनी म्हटलेले आहे .

## जैन आचार्य विद्यासागरजी महाराजांनी घेतली समाधी; 3 दिवसांच्या उपवासानंतर देहत्याग

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** जैन दिगंबर मुनी परंपरेचे आचार्य मुनि श्री विद्यासागर जी महाराज यांनी शनिवारी मध्यरात्री 3.35 ला डोंगरगड येथील चंद्रगिरी तीर्थ म. प्र.येथे देहत्याग केला. शुक्रवार रोजी दुपारनंतर मुनिश्री नी बुद्धी पूर्वक जागृत अवस्थेमध्ये सलेखना धारण केली त्यांनी आचार्य पदाचा त्याग करून तीन दिवस उपवास धारण केले आणि मौन धारण केले. समतापूर्वक समाधी धारण केली काही दिवसांपूर्वीच भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्रभाई मोदी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला गृहमंत्री अमित भाई शहा पियुष गोयल अशा अनेक मान्यवरांनी तिथे जाऊन त्यांचे दर्शन घेतले होते. मुनीश्री विद्यासागर जी महाराज यांचा जन्म कर्नाटक मध्ये बेळगाव जिल्ह्यात सदलगा या गावात झाला होता त्यांचे वडील मल्लप्पा होते त्यांनी सुद्धा मुली सागर होऊन दीक्षा घेतली त्यांची माताजी श्रीमंती या होत्या पण त्या सुद्धा दीक्षा घेऊन आ रींका समयमती म्हणून झाल्या. आचार्य विद्यासागर जी यांनी 30 जून 1968 मध्ये अजमेर येथे 22 व्वा वर्षी आचार्य ज्ञानसागर जी महाराज यांच्याकडून दीक्षा घेतली होती जे आचार्य शांतीसागर जी महाराज यांचे शिष्य होते 22 नोव्हेंबर 1972 मध्ये ज्ञानसागर जी महाराज यांच्याकडून त्यांना आचार्य पद दिले गेले होते त्यांच्या त्यांचे भाऊ अनंतनाथ शांतिनाथ यांनी आचार्य विद्यासागर जी यांच्याकडून दीक्षा ग्रहण केली व ते मुनी योगसागर आणि मुनी समय सागर जी म्हणूनओळखले . त्यांच्या घरात फक्त त्यांचे 1मोठे भाऊ गृहस्थ श्रमात आहेत. त्यांना संस्कृत सहित हिंदी मराठी कन्नड इंग्रजी विशेष ज्ञान होते त्यांनी विविध भाषेमध्ये रचना केली आहे यावर 100 पेक्षा जास्त प्राध्यापकांनी मास्टर ऑफ डायरेक्ट यासाठी अध्ययन केले आहे त्यांच्या जाण्याने जैन धर्मा सहित पूर्ण भारतवासीयांची हानी आहे. लाखो करोडो अनुयायांच्या साक्षीने त्यांना विनयांजली अर्पण केली.



# रेसिडेन्शिअलचा चैतन्य गर्जे फिरत्या चषकाचा मानकरी

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** कै. सुनील गोपीनाथ वायकर यांच्या स्मरणार्थ उदयनराजे'स गिगाबाईट कॉम्प्युटर टायपिंग, केडगाव यांच्या वतीने आंतरशालेय वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत केडगाव व परिसरातील 11 शाळा सहभागी झाल्या. रेसिडेन्शिअल चा विद्यार्थी चैतन्य गर्जे फिरता चषकाचा मानकरी ठरला. द्वितीय क्रमांक साईराम माने व तृतीय क्रमांक भाग्यश्री बांगर यांनी मिळविला. स्पर्धेचे परीक्षक डॉ. भाऊसाहेब खांदवे व मारुती शेळके यांनी केले. कार्यक्रमास रवींद्र घाटे, जे. आर. पवार, प्रा. डॉ. रामकृष्ण बोडखे,, नगर जिल्हा गणित व विज्ञान मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार निक्रड, श्री अंबिका विद्यालय, जुनिअर कॉलेजच्या मते, एस. एस. मोहिते विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जाधव उपस्थित होते. आपल्या वकृत्वशैलीने श्रोत्यांना आकर्षित व प्रभावित करून आपले विचार पटवून देण्याचे कौशल्य हे वकृत्व कलेत असते. वकृत्व हे एक शास्त्र असून ती एक उत्तम कलाही आहे. आपले विचार मांडत असताना देह बोली, हावभाव, आवाजातील चढ-उतार, समर्पक उदाहरण प्रभावी सुरुवात, अनुरूप प्रसंग निर्मिती, विनोदाची निर्मिती अचूक शब्द फेक, प्रेक्षकांना साजेस असा आशय या गोष्टी वक्त्याकडे सादरीकरणात असाव्यात. भाषणाची सुरुवात ही प्रभावी असेल तर श्रोत्यांचे लक्ष वेधून घेणे सहज शक्य होते. भाषणाचा मध्य हा विषयाचा गाभा असावा तर शेवट श्रोत्यांच्या मनावर चिरस्थानी ठसा उमटणारा असावा. शालेय विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या उद्दिष्टाने, उदयनराजेस गिगाबाईट कॉम्प्युटर टायपिंग केडगाव यांनी केलेले आहे. अशी माहिती संस्थेचे संस्थापक संचालक बाबासाहेब गोपीनाथ वायकर यांनी दिली. स्पर्धा यशस्वीतेसाठी नगर जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी निर्मला साठे, रूपाली कार्ले, शैला वाबळे, सुकन्या पवार, संकेत लोखंडे, कोमल वायकर, आदित्य जाधव, ओंकार लिपाने यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया शिबिर

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** शिर्डीसह परीसरात असलेल्या रुग्णाच्या दृष्टीने सामाजिक बांधिलकी हा दृष्टीकोन ठेवत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर शिर्डी येथील श्री साई भक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट व आर झुंनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल मुंबई तसेच आयोध्या हॉस्पिटल शिर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे सामाजिक भावनेतून मोतीबिंदू मुक्त शिर्डी परिसर अभियानांतर्गत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ ते दुपारी दोन या वेळेत संपन्न होणार असल्याची माहिती लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टचे विश्वस्त अरुणराव गायकवाड व साईराज गायकवाड यांनी दिली लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या माध्यमातून या अगोदर देखील विविध सामाजिक उपक्रम नेहमीच राबविण्यात येतात त्याच धर्तीवर सामान्य गोरगरीब रुग्णाना मोफत वैद्यकीय सेवा सुविधा मिळाली पाहिजे हा हेतु ठेवून शिबिर संपन्न होणार आहे तरी रुग्णांनी येताना आपल्या बरोबर आधार कार्ड रेशन कार्ड प्रत सोबत ठेवावी तसेच शस्त्रक्रिया प्रसंगी जाण्याची राहण्याची जेवणाची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाणार असून रुग्णानी याच लाभ घ्यावा असे आवाहन गायकवाड यांनी केले आहे.

# जि. प. खडकी सदार शाळेतील विद्यार्थ्यांनी लुटला शैक्षणिक सहलीचा आनंद

## परदेशी पाहुण्यांसोबत साधला संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** जि. प. शाळा खडकी सदार शाळेतीलविद्यार्थ्यांनी अजिंठा, जाळीचा देव, हिवरा आश्रम येथे गेली. सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अजिंठा लेण्या बघीतल्या व त्या ठिकाणी सर्व लेण्यांविषयी माहिती घेत, छायाचित्रे काढत विद्यार्थ्यांनी ठळक, महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या वहीत उतरवून घेतल्या. परदेशी पाहुण्यांसोबत संवाद साधला. विद्यार्थ्यांनी हिवरा आश्रम येथील स्वामी विवेकानंद यांच्या स्मारकाला भेट दिली. विवेकानंद आश्रम शुकदास महाराजांसाठी ओळखला जातो. परंतु महाराजांचे निधन झाले तरीही येथील व्यवस्था महाराजांच्या शिस्ती प्रमाणेच दिसून येते. शुकदास महाराजांनी १४ जानेवारी १९६५ रोजी मेहकर ते चिखली महामार्गावर हिवरा आश्रम गावी या विवेकानंद आश्रमची लोकसेवेसाठी स्थापना केली. विवेकानंद आश्रमाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा आहे. धर्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारा अशीही या आश्रमाची ओळख आहे, अशी सर्व माहीती विद्यार्थांना देण्यात आली आहे. आमच्या जि प वरिष्ठ प्राथमिक शाळा खडकी सदार ची शैक्षणिक सहल यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री कैलासराव मानवतकर सर,स.अ.दागडीया मॅडम, जिरवणकर सर, शिंदे सर, गव्हाणे सर व गाडे सर यांनी परिश्रम घेतले.

# पिंपळनेर येथे क्रांतिपिता लहुजी वस्ताद साळवे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** येथील पिंपळनेर येथे आज भारतीय स्वातंत्र्याच्या सशस्त्र क्रांतीचे जनक आद्यक्रांती गुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी थोर महामानव क्रांतीपिता लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले. त्यानंतर लहू वंदना घेण्यात आली.

यावेळी मातंग समाज अन्याय निवारण समिती प्रवक्ते ऍड. विलास साबळे, राजू गोफणे सर, सुनिल लोखंडे, रघु निकाळजे, अतिश पाटोळे, गजानन अवसरमोल,प्रविण हांडे, गजानन अंभोरे, देवानंद धोंगडे,बाळासाहेब गायकवाड,सुरेश खंदारे, अर्जुन लोखंडे, नितिन दंडे, गोपीनाथ लोखंडे, मुकेश अंभोरे, योगेश अंभोरे, गणेश लोखंडे, अजय लोखंडे, शिवानंद अवसरमोल, उमेश अंभोरे, विशाल अवसरमोल व समाज बांधव उपस्थित होते.



# भगवंताचे नामस्मरण केल्यास मनुष्यजीवनात विरक्ती

## ह.भ.प. संदीप महाराज ऋषीगढ यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**जामनेर :** तालुक्यातील पळसखेड काकर येथे जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणतात संसार हे एक व्यसन आहे. संसारी मनुष्याच्या हातून कळत नकळत अपवित्र, अशुद्ध गोष्टी घडत असतात. म्हणून संसाररूपी व्यसनाधीन लोकांनां भगवंताची व्याप्ती कळत नाही. त्यामुळे ते देवाला भजत नाहीत. परंतु या मायावी भावसागरातून मुक्ती मिळवायची असेल तर परमार्थ केलाच पाहिजे. भजन-कीर्तनाच्या माध्यमातून भगवंतांचे नामस्मरण केल्याने मनुष्य जीवनात विरक्ती निर्माण होते, असे प्रतिपादन ह.भ.प.संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा यांनी केले.

पळसखेड काकर येथे चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद् भागवत कथा सोहळ्यामध्ये कीर्तन आयोजन करण्यात आले होते.ह.भ.प. संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा यांनी कीर्तन सेवेसाठी त्यांनी संसाराच्या अंगी अवधीच व्यसने ! आम्ही या कीर्तने शुद्ध झालो !! आता हे सोवळे झाले त्रिभुवन ! विषम धोऊन सांडीयेले !! ब्रम्हपुरी वास करणे अखंड ! न देखीजे तोंड विटाळाचे !! तुका म्हणे आम्हा एकांताचा वास ! ब्रम्ही ब्रम्हरस सेऊ सदा !! या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची निवड केली होती. जीवनात कठोर साधना केल्याशिवाय साध्य प्राप्त होत नाही. संसार व परमार्थ यात पूर्णतः भिन्नता आहे. संसारात सर्वकाही माझे या स्वार्थीवृत्तीतून सत्ता, संपत्ती संग्रही केली जाते तर परमार्थात या सर्वांचा त्याग केला जातो. ईश्वराच्या नामस्मरणातून परोपकारी भावना निर्माण होते व यातूनच दुसऱ्यांसाठी जगण्याची प्रेरणा मिळते. कीर्तनातुन विरक्ती निर्माण होते. म्हणून जीवनात सत्संग झाला पाहिजे. त्यासाठी एकांत व सातत्या यांची आवश्यकता आहे असे संदीप महाराज म्हणाले.यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायनाचार्य,तसेच संत-महंत, कीर्तन श्रवण करण्यासाठी परिसरातून पंचक्रोशीतील आलेले भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह समितीच्या वतीने ह.भ.प.संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.

# जरांगे यांना पाठिंबा म्हणून बाजार सावंगी कडकडीत बंद

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील हे



आमरण उपोषण करत असुण उपोषणाचा साहवा दिवस आहे.मात्र याकडे राज्य सरकार प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने पाठिंबा म्हणून बाजार सावंगी ता खुलताबाद येथे आज दि.१७ शनिवारी कडकडीत बंद पाळण्यात आला.


मुख्य बाजार पेठ, रेणुका माता मंदिर परिसर, बसस्टँड परिसर, नवीन मार्केट आदि ठिकाणी सर्व व्यवसाय प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आले. तर औषधी प्रतिष्ठान,दवाखाने,शाळा,बँका वगळता सर्व प्रतिष्ठाने बंद दिसून आली.फक्त रस्त्यावर वहाने सुरु होती तर त्यांना चहा पाणी थंड पेय साठी भटकती करावी लागली. मात्र त्यांना कोठेच काही न मिळाल्याने हाल परेशान व्हावे लागले. आज खुलताबाद तालुक्यात बंद पुकारण्यात आला होता मात्र बाजार सावंगी येथे कडकडीत बंद दिसून आले.अनेकांची गैरसोय झाली.मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांना यापूर्वी ही कडकडीत बंद पाळून पाठिंबा देण्यात आला होता. आज पुन्हा पाठिंबा दर्शविण्यात आला.

# केशव भवानी काळे यांच्या 'होय ! हे असेच आहे' या आत्मचरित्राला ॲग्रोवन न्यूज साहित्य पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सातारा जिल्ह्यातील फलटण येथील ॲग्रोवन न्यूज परिवारा तर्फे नुकतेच 2023 चे साहित्य पुरस्कार घोषित करण्यात आले यामध्ये येथील जेष्ठ साहित्यिक व कवी केशव भवानी काळे यांच्या " होय ! हे असेच आहे " या आत्मचरित्राचा समावेश करण्यात आल्याची माहिती ॲग्रोवन न्यूज परिवाराचे अध्यक्ष श्री. प्रकाश सस्ते व पुरस्कार समिती प्रमुख प्रा. विजय काकडे यांनी दिली.

पुरस्कार वितरण 27 फेब्रुवारी 2024 रोजी फलटण जि. सातारा या ठिकाणी होणाऱ्या धर्मवीर छत्रपती संभाजी 7 व्या साहित्य संमेलनात करण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र




असे पुरस्काराने स्वरूप आहे. इतर पुरस्कार खालील प्रमाणे आहेत.

**उत्कृष्ट कविता संग्रह :** १) दीडदा दीडदा - डॉ. अदिती काळमेख २) रक्त फुलांचे ताटवे- नोमेश नारायण ३) पालखी काजव्यांची- सौ. स्वाती तोंडे पाटील ४) या झोपडीत सुद्धा माणूस राहतो - प्रकाश बनसोड ५) काव्य स्पंदन - सौ. सिंधू साळेकर विशेष काव्य पुरस्कार : रानकाव्य - विमल माळी **उत्कृष्ट कथासंग्रह :** १) बाभूळ फुलं - प्रतिभा खैरनार २)बाना - प्रा. रसूल सोलापुरे ३) पारावरच्या गोष्टी - शेखर खंडेराव फराटे ४) माझ्या अंगात येऊ दे - सुभाष पाचारणे

आत्मचरित्र १) होय! हे असंच आहे - केशव भवानी काळे 2) एक पणती उजेडासाठी - प्रतिमा इंगोले 3) निवडुंगाचे काटे - जीजी कांबळे

समीक्षण व संशोधन १) मराठी लेखकांची ग्रामीण कथा स्वरूप व समीक्षण- डॉ. शकुंतला भारंबे - फेगडे २) छ. श्रीमंत शिवाजी राजे भोसले घराण्याच्या सोयरीकीचा इतिहास - राहुल उर्फ पोपटराव बर्गे 3) रायबा - सह्याद्री कन्या डॉ.शितल शिवराज मालुसरे **ललित लेख संग्रह :** १) ललितरंग - विद्यापेठे 2) मनातली देवळी - रेखा दीक्षित **कादंबरी विभाग :** १) एक भाकर तीन चुली - देवा झिंजाड 2) विधीलिखित - नितीन सुतार 3) आयोध्याची उर्मिला - स्मिता दातार

4) कडेलूट डॉ. श्रीकांत पाटील

**नाटक विभाग :** 1) यशबळी - सुजित कुमार कांबळे 2) छीन्नी - हरीश बोढारे 3) गोंडवानाचा महायोद्धा - चुडाराम बल्हारपुरे

**बालसाहित्य विभाग :** 1) रेटू - प्रा. साईनाथ पाचारणे 2) मोनास पत्र डॉ विद्याधर बन्सोड 3) आभाळातील जहाज - रश्मी गुजराती 4) घर पळून गेलं - शुभदा सुरंगे

**मराठी गझल संग्रह :** 1) मी छंदी स्वच्छंदी - जयराम धोंगडे 2) गझल स्पंदन - अजय बिरारी 3) काजवा मनाचा - डॉ.सुभाष कटक दौंड

**अध्यात्मिक ग्रंथ :** 1) गोस्वामी शौर्यगाथा - प्रा. वसंत गिरी 2) जैन नाट्य काव्य समुच्चय - श्रीमती कांचन अशोक वनकुद्रे 3) स्वानंद - विकास नागठाणे

**वैचारिक लेख संग्रह :** 1) बोल हे अंतरीचे- दिनेश चव्हाण 2) अक्षरांची रांग - रामचंद्र इकारे मराठी अनुवाद 1) यज्ञ आणि इतर कविता - रचना.

## विविध मागण्यांसाठी भूमिपुत्र छेडणार आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यां आणि शासनाकडून घोषित केलेली आर्थिक मदत तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी. तसेच नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला असून, सदर प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश करण्यात यावा. आदी मागण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या मार्गदर्शनात वीस फेब्रुवारी पासून आमरण उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार यांनी दिली आहे. भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून मंगळवार दिनांक 20 फेब्रुवारीपासून विविध मागण्यांबाबत अमरण उपोषण करण्यात येणार आहे. नदीजोड प्रकल्पातून (नळगंगा/ वैनगंगा) वाशिम जिल्ह्याला वगळण्यात आले. वाशिम जिल्याचा समावेश नदीजोड प्रकल्पात करण्यात यावा. पीकविमा भरणारे शेतकरी पीक विम्यापासून वंचित आहेत त्यांना तात्काळ पीक विम्याचा लाभ देण्यात यावा. यामध्ये प्रथम 25% ॲग्रीम विम्याची रक्कम तात्काळ सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी व नियमित पीक विमा सुध्दा देण्यात यावा. नाफेड व सरकारने सोयाबीन खरेदी सुरू न केल्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे क्विंटल मागे पाचसे रूपये नुकसान झाले. खरेदीची 6 फेब्रुवारी हि अंतीम तारीख होती तारखे पर्यत एकही क्विंटल सोयाबीन जिल्ह्यात खरेदी झाली नाही. त्यामुळे मुदत वाढ देऊन तात्काळ सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करावी. शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला मोफत व मुबलक विज देण्यात यावी व शेतकऱ्यांवर दाखल विज चोरीचे गुन्हे सरकारने मागे घ्यावेत. जंगली जनावरे रोही, हरीण, वानर, रानडुक्कर यांचा शेतकऱ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा. ग्रामीण भागातील घरकुलाची अनुदान रक्कम दुप्पट करावी व घरकुला साठी जागा उपलब्ध करून द्यावी किंवा जागेसाठी वेगळा फंड देण्यात यावा. वरील सर्व शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत अमरण उपोषण करण्यात येणार आहे.



## गरुड महाविद्यालयात सहादिवसीय आत्मनिर्भर युवती अभियान संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील शेंदुर्णी शहर येथे अ र भा गरुड कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय शेंदुर्णी येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांनी दिलेल्या मान्यतेनुसार दि ०९/०२/२०२४ ते १५/०२/२०२४ या कालावधीत विविध व्याख्यान कार्यक्रमाच आयोजन करण्यांत आले होते. या कार्यक्रमाचा समारोप समारंभ दि १५/०२/२०२४ रोजी पार पडला. कार्यक्रमास प्रा डॉ संजय पाटील, पंकज महाविद्यालय चोपडा (जिल्हा समन्वयक विद्यार्थी विकास विभाग कबचौ उमवी जळगांव)हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना सर्वांगीण विकासाची योग्य दिशा या विषयी मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात युवतींनी सामाजिक ,आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीस स्वतः प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. विद्यापीठाच्या माध्यमातून राबविलेल्या विविध योजना आणि त्यांचा युवतींना होणारा लाभ यासंदर्भात डॉ पाटील यांनी संवाद साधला. या सदर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा श्याम साळुंखे होते. त्यांनी विद्यार्थिनी महाविद्यालयाच्या प्रत्येक कार्यक्रमात विद्यार्थिनींना सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ योगिता चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ अजिनाथ जीवरग आणि आभार डॉ सुजाता पाटील यांनी मानले. एकूण सहा दिवसांच्या व्याख्यानात सौ उषा पाटील, अश्विनी पाटील, श्री दिलीपजी पाटील पीएसआय पाहूर, श्री स्वप्नील बंगाली, पुणे, कु भग्याश्री बावस्कर, वैद्यकीय अधिकारी शेंदुर्णी, श्री दिनेश पाटील ,जिल्हा समन्वयक रासेयो उमावी जलगांव, श्री. उदय पाटील यूनियन बँक ऑफ इंडिया या मान्यवरांचे वेगवेगळ्या विषयावरील मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. या दरम्यान युवतींचे HB तपासणी आणि सिकलसेल तपासणी करण्यांत आली. एकूण ८० विद्यार्थीनी सहभाग नोंदविला.

## शिवजयंती उत्साहात साजरी करा : कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा परिसरात १९ फेब्रुवारीला शिवजयंती उत्साहात आणि मोठ्या आनंदात साजरी करा असे आवाहन प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हा भारताच्या इतिहासातील एक दैदीप्यमान अध्याय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय ध्येय धोरणे आजही आपल्या सर्वासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत. त्यामुळे त्यांच्या जयंती दिनी त्यांच्या प्रति कृतज्ञता अर्पण करणे, हे सर्वांचे कर्तव्य आहे. आप आपल्या घरांवर आज भगवे झेंडे लावून गुढी उभारली गेली पाहिजेत. घरासमोर सडा, रांगोळी काढून छत्रपती शिवाजी महाराज प्रत्येक चौकात चौक सजविलेले पाहिजेत त्यामुळे राज्यातील सर्वांनी ही शिवजयंती अतिशय उत्साहाने आणि मोठ्या प्रमाणात साजरी करावी, असे आवाहन प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केले आहे. यासंदर्भात, जिल्ह्यात शिवजयंती उत्सव विविध कार्यक्रमांनी, सर्वांचा सहभाग घेत साजरी करण्यात येणार आहे. शिवजयंती ज्या ठिकाणी साजरी होईल, त्या ठिकाणचा परिसर स्वच्छ सुंदर व आकर्षक ठेवावा. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्वच्छ करुन घ्यावा. ज्या ठिकाणी जयंती साजरी करण्यात येणार आहे त्याठिकाणी रंग-रंगोटी करुन विद्युत रोषणाई करणे, रांगोळी काढणे, भगवा ध्वज उभारणे आदी व्यवस्था करण्याबाबत करण्यात यावे. शिवजयंती उत्सवाच्या आरंभी महाराष्ट्र राज्याचे राज्यगीत वाजविण्यात यावे व त्यासाठी पोलीस बँडची व्यवस्था करावी. कार्यक्रमाच्या अगोदर व कार्यक्रमादरम्यान शिववंदना, स्थानिक कलावंतांकडून पोवाडा गायन, छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भातील गीत-गायन इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. शिक्षण विभागा मार्फत विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, शौर्यगीत स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात. यासंदर्भात स्थानिक जिल्हा स्तरावर व्यापक प्रसिध्दी करावी.

## रस्त्याची साफसफाई करून पदाधिकाऱ्यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**चामोर्शी :** आष्टी येथील श्री छत्रपती शिवस्वराज्य सेवा संस्था ही नेहमी सामाजिक उपक्रम राबवण्यात अग्रेसर असते दिनांक १८ फेब्रुवारी रोजी पहाटे तीन वाजताच्या दरम्यान चामोर्शी तालुक्यातील आष्टी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते शिवाजी चौक येथील मुख्य रस्त्याची स्वच्छता करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. आष्टी येथे श्री छत्रपती शिवस्वराज्य संस्थेच्या वतीने दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची शिवजयंती उत्सव साजरी करण्यात येणार आहे या शिवजयंतीच्या उत्सवाला येणाऱ्या शिवभक्तांना पाहून श्री छत्रपती शिवस्वराज्य संस्थेचे अध्यक्ष पवन रामगिरकार यांच्या नेतृत्वात ही स्वच्छता मोहीम राबवली आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आष्टी शहरात श्री छत्रपती शिवस्वराज्य संस्थेच्या वतीने रांगोळी स्पर्धा, किर्तन यांसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्वच्छाता मोहीमेत



श्री छत्रपती शिवस्वराज्य संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष पवन रामगीरकार,सचिव संदीप तीवाडे, उपाध्यक्ष संदीप लोङ्डुलीवार, रीतिक पांढरमिसे,प्र तिक रहाटे, देवा बोरकुठे, केतन कोकेरवार,आदित्य सिरपूरवार गणेश कलाश्रपवार, लाला चावरे,द्रुप पेरकावार,रुपेश येलमुले यांनी या स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# माजी खासदार चषक कबड्डी सामन्यांचे थाटात उद्घाटन

## नामांकित क्रीडापटू घडवण्यात मोलाचे योगदान : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्थानिक सत्शिल बहूउद्देशीय व्यायाम प्रसारक मंडळ तथा संन्मित्र क्रीडा मंडळ चंद्रपूरद्वारा चंद्रपूर, वणी, आर्णी लोकसभा क्षेत्रातील कबड्डी पटूंसाठी आयोजित 'माजी खासदार चषक' पुरूषांचे भव्य खुल्या कबड्डी सामन्यांचे उद्घाटन दि. 16 फेब्रुवारी 2024 रोजी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या शुभहस्ते पार पडले.

विठ्ठल मंदिर वार्डातील टागोर शाळेच्या पटांगणात दि. 16 ते 18 फेब्रुवारीपर्यंत आयोजित या पुरूषांच्या कबड्डी सामन्यांच्या उद्घाटन समारंभास भाजपा नेते विजय राऊत, खुशाल बोंडे, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, रमेश भूते, विनोद शेरकी, माजी नगरसेवकद्वय श्याम कनकम, राजेंद्र अडपेवार, राजेंद्र खांडेकर, सचिन साधनकर, प्रशांत करजभाजने, राकेश चहारे, विपुल चहारे व अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

आपल्या उद्घाटनपर भाषणात हंसराज अहीर यांनी दोन्ही मंडळांच्या क्रीडाविषयक योगदानाबद्दल गौरवोद्गार काढत सतशील व सन्मित्र मंडळाद्वारे सर्वच क्रीडा प्रकारातील युवा खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून त्यांना जिल्हास्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत कामगीरी पार पाडण्यास संधी दिली. कबड्डी खेळास नेहमीच प्रोत्साहन राहिले आहे. विदर्भस्तरीय व अन्य खेळांचे सामने आयोजित करुन खेळाडूंना त्या-त्या खेळात प्रदर्शन करण्यास वाव दिला आहे. पठाणपूरा, विठ्ठल मंदीर वार्ड, जोडदेऊळ, हिवरपूरी हे वार्ड प्रतिभावान खेळाडूंची खाण आहे. येथील रसीक खेळाडू प्रिय आहेत. त्यामुळे या परिसराचे विशेष आकर्षण असल्याचे अहीर म्हणाले. या मंडळाद्वारा अनेक क्रीडा प्रकारातील खेळाडूंना नावलौकीक मिळवून देण्यास या मंडळांचे अभुतपूर्व योगदान असल्याचेही त्यांनी सांगीतले. या कबड्डी स्पर्धेत सहभागी सर्व मंडळांच्या खेळाडूंचे स्वागत करून हंसराज अहीर यांनी त्यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मंडळाच्या वतिने हंसराज अहीर यांचे व मान्यवर अतिथींचे स्वागत करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यास मंडळाचे पदाधिकारी सर्वश्री.रवींद्र शेरकी, अमित लडके, महेंद्र व्याहाडकर, प्रमोद डाखोरे, किशोर कुडे, नितीन कुमरवार, मनोज शेरकी, गणेश काळे, समीर चापले, सचिन चापले, राम लांडगे, महेंद्र शेरकी, दीपक लडके, संकेत वांढरे, घनशाम डंभारे, मोहन चैधरी, मेघनाथ चैधरी, अभिजित चैधरी, शाम चापले, रोहीत लडके, मंगेश वाघाडे, ओम लडके, सौरभ शेरकी यांची उपस्थिती लाभली होती. या समारंभास बहूसंख्येने महिला, पूरूष युवक व क्रीडा क्षेत्रातील खेळाडू उपस्थित होते.



# लामनगाव येथे आनंद नगरी व हळदी कुंकू कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जि. प. प्रा. शा. लामनगाव येथे आनंदनगरी व हळदी कुंकू या कार्यक्रमाचे उदघाटन शालेय अध्यक्ष किशोर मालोदे यांच्या हस्ते झाले. या आनंद नगरी मध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन 40 स्टॉलमधे कचोरी, भजे, पोहे, पाणीपुरी, वडे, इडली सांबर, भेळ, पापड, नरडे, उसाचा रस, पपई, ओला हरभरा, भाजीपाला, भेंडी, वांगी, अळूचे पाने इ स्टॉल लावण्यात आले होते. यानंतर महिलांसाठी शाळे तर्फे हळदी कुंकू कार्यक्रम उपाध्यक्ष सोनिया गायकवाड व उपसरपंच सुनीता मालोदे यांच्या मार्गदर्शनाखाली घेऊन उपस्थित महिलांना शाळे तर्फे प्रत्येक महिलांना "समई"संक्रांत वाण म्हणून वाटप करण्यात आले

या कार्यक्रमास केंद्रप्रमुख गायकवाड मॅडम, शालेय अध्यक्ष किशोर मालोदे,उपसरपंच सुनीता मालोदे, उपाध्यक्ष सोनिया गायकवाड, अशोक मालोदे, राजू राठोड, अरुण रगडे, सुरेश मालोदे, कचरू शिंदे, रमेश मालोदे, ज्ञानेश्वर काळे,गोरख वाकळे, एकनाथ मालोदे, सरपंच रंगनाथ काळे, सरपंच बाळू गायकवाड, कल्पना ज्ञानेश्वर मालोदे, वंदना देविदास मालोदे, अंगणवाडी ताई वंदना मालोदे, किशोर कारभारी मालोदे, वैशाली मालोदे, लक्ष्मीबाई वाहुळ, शोभा मालोदे, सुप्रियाताई मालोदे,अश्विनी मालोदे, वैष्णवी मालोदे, सविता मालोदे,सरला मालोदे, पूजा लोखंडे, रेखा मालोदे,निर्मला गायकवाड, मच्छिंद्र मालोदे यांची पुणे महानगरपालिका मधे वरिष्ठ लिपिक म्हणून निवड झाल्याने मुख्याध्यापक बी डी जाधव यांनी सत्कार केला. खाडे सर, भंडारी सर, दुतोंडे सर, साळुंके सर, शेख सर, बोबडे सर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी सर्व गावकरी व विद्यार्थी उपस्थित होते.





# वंचित बहुजन आघाडी वाहन चालक-मालक संघटनेतर्फे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दि. 16 फेब्रुवारी रोजी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष मुक्तार भाई सय्यद व वाहन चालक-मालक संघटनेचे तालुका अध्यक्ष शेख समीउद्दीन सलीमोद्दीन यांच्या वतीने पोलीस ठाणे, महानगरपालिका, तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग खुलताबाद या ठिकाणी निवेदन देण्यात आले आहे. शहरात सात ठिकाणी रिक्षा थांबा स्टॅन्ड, विविध पॉईंटवर जसे भद्रा मारुती मंदिर परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोर औरंगाबाद रोड, फुलंब्री रोड, वेरूळ रोड, एस.टी बस स्थानकाजवळ, म्हैसमाळ रोड, बुधवार आठवडी बाजार पाण्याच्या टाकी जवळ या सर्व ठिकाणी रिक्षा स्टॅन्ड थांबवण्यासाठी जागा उपलब्ध करून परवानगी देण्यात यावी. जेणेकरून खुलताबाद शहरांमध्ये रहदारीचा विचार करून जनतेची गैरसोय होत असल्या कारणाने आपल्या शहरांमध्ये या सात ठिकाणी रिक्षा थांबणे गरजेचे आहे. थांबा अधिकृत झाल्यावर वाहतुकीला अडथळा होणार नाही. रस्त्यामध्ये कोणी नियमाचे उल्लंघन करणार नाही स्वच्छ व सुंदर शहर राहील यासाठी आपल्या परीने जातीने लक्ष घालून वंचित बहुजन आघाडीच्या मागणीवर सहकार्य करावे असे निवेदनात म्हटले आहे यावेळी तालुका महासचिव राजाराम घुसाळे अण्णा बनकर सचिव दिनकर शिरसाट मेराज शेख, जावेद शेख, बाळू पंडित, राजू तुपे, शेख सिद्धीक, आसिफ सय्यद, शेख कदीर, रफिक शेख, आवेज ,मिसबाऊदिन शेख, व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी बालवयापासून जिज्ञासू वृत्ती जोपासावी : दिनेश चोखारे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विद्यार्थ्यांमध्ये अंतराळविषयक ज्ञानात भर पडावी, विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, यासाठी बालवयापासून जिज्ञासू वृत्ती जोपासावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, महाराष्ट्र संचालक तथा माजी सभापती तसेच काँग्रेस नेते दिनेशभाऊ चोखारे यांनी केले नवरत्न स्पर्धा तसेच विज्ञान प्रदर्शनात चमकणाऱ्या जिल्हा परिषद शाळांमधील 30 विद्यार्थ्यांची कर्नाटक राज्यातील बंगलुरु येथील इस्रो प्रकल्प पाहण्यासाठी निवड करण्यात आली होती. इस्रो दौऱ्यावरून परत आलेल्या बल्लारपूर तालुक्यातील विद्यार्थ्यांचे कौतुक करताना ते बोलत होते. यावेळी बल्लारपूर तालुक्यातील कवडजई येथील कु. ऋतुजा गोपीचंद पेंदोर आणि जुनी दहेली येथील सक्षम राजेंद्र गोंधळी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष गोवींदा पाटील उपरे, ओबीसी नेते सचिन राजूरकर, सामाजिक कार्यकर्त्या नाजुका हनुमान आलाम याची उपस्थित होती.

जिल्हा परिषद शाळांमधील 30 विद्यार्थ्यांची इस्रो दौऱ्यासाठी निवड करण्यात आली होती. यात बल्लारपूर तालुक्यातील कवडजई येथील कर्मवीर विद्यालय, येनबोडी येथे वर्ग ८ विला शकत असलेली कु. ऋतुजा गोपीचंद पेंदोर आणि जुनी दहेली येथील श्री. बालाजी हायस्कुल बामणी दुधोली येथे वर्ग ९ वी मध्ये शिकत असलेला सक्षम राजेंद्र गोंधळी या दोघांचाही कौतुक व भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. दोघांनीही आपल्या यशाचे श्रेय शिक्षकवृंद तसेच आई वडिलांना दिले आहे.




शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर